म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १००३

१९५८

REFBK-0010583
REFBK-0010583


लाटा
आणि
लहरी
— प्रफुल्लदत्त

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २२७४८ वि: काव्य
क्रमांक १४४३ नों: दि: १६/११/८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०४१३

REFBK-0010583
REFBK-0010583

# लाटा
आणि
# लहरी

प्रफुल्ल-दत्त

किंमत दोन रुपये

प्रकाशक :
बा. शा. इनामदार
इनामदार बंधु प्रकाशन
९९१ सदाशिव, पुणें २

प्रसिद्धी : प्रथमावृत्ति
२५ सप्टेंबर, १९५९

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें २

जिच्या प्रापंचिक दूरदर्शित्वामुळें
मला दैनंदिन विवंचनेपासून
दूर राहतां आलें त्या —

# सौ. विद्यावतीस

हें तपोधन अर्पण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम २५७४९ वि: का
क्रमांक १४४३ नों: दि: १६-

●

यौवनीं घेतलें मंदिर बांधायाला
शोधितां शिला, बांधितां काळ हा सरला
यापुढें घालुनी घाव घणाचे केव्हां
मन्मानिंचा आणूं ईश मूर्तरूपाला

● ● ●

# किनाऱ्यावरून

अनुक्रम २५७४९ वि: लोक
क्रमांक १८४३ नों: दि: १८-११-

आपल्या संकल्पांची जोपासना करण्याचें कार्य पुष्कळदां आपले सुहृद्जन करीत असतात. माझ्या कांहीं मित्रांनीं वेळोवेळीं प्रोत्साहनपर सूचना केल्या म्हणूनच मी इतके दिवस या छदांत रमलों.

भावगीतांच्या तरलतेंत जसें माझें मन रमे, तसेंच विचार-विलासाच्या वलयांतही तें पूर्वींपासून रमे. पहिल्या पहिल्यानें लाटा-लहरींच्या या भाव-समाधींत एक वेगळ्याच प्रकारचा आनंद आहे असें मला जरी वाटत असे, तरी इतरांना त्या दाखविण्याचें माझ्या हातून झालें नाहीं. परंतु सत्यकथा आणि साहित्य यांसारख्या 'रुचि' पूर्ण मासिकांनीं त्यांतील कांहींचा स्वीकार केला. तेव्हां जीवनाच्या किनाऱ्यावरून पाहिलेल्या साऱ्याच लाटा-लहरी महाराष्ट्र-रसिकांना दिसाव्यात या हेतूनें मी त्या अनेक ठिकाणीं प्रसिद्ध केल्या. त्यांचेंच हें दर्शन आहे.

शिक्षकाच्या भूमिकेवरून प्रवृत्तीप्रमाणें अध्ययन आणि प्रतिभेप्रमाणें अध्यापन करतांना साहित्यांतील ज्या कल्पनांशीं मी एकजीव झालों त्यांतील एकाददुसरी भावछटा या तांडव-तुषारांत कुणाला दिसेल. विशेषतः गुरुदेव टागोरांच्या वाङ्मयाचा आवडीनें अभ्यास करतांना तसें झालें असेल. किनाऱ्यावरून सहल करणाऱ्या मुशाफिराचीं पावलें कांहीं पडघमवर पडणाऱ्या टिपरीच्या तालावर पडत नाहींत. त्यांत विशेष प्रकारची गुंगी असते. त्याच गुंगींतून माझ्या ह्या लाटा-लहरींच्या दर्शनांत रसिक वाचक जरी घटकाभर रमला तरी मला समाधान होईल.

आज नऊ साडेनऊ वर्षांनंतर रसिक-वाचक माझ्या जीवनाच्या किनाऱ्यावर उभे आहेत. त्यावेळीं १७४ लाटा-लहरींच्या उन्मेषांचें त्यांना दर्शन झालें, आज ती संख्या तिपटीच्या जरा कमी आहे.

तपाहून अधिक काळ मीं या मनोवृत्तींत रमलों आहें. १९४६ सालीं पहिले पांच-सात विचार मीं माझे मित्र श्री. टी. पी. चिटणीस यांना दाखविले. तेव्हांपासून आजपर्यंतची त्यांनीं माझी तपाची साधना

जवळून पाहिली आहे. त्या जवळिकेंत सद्‌भावनेला न टाळतां येणारा कौतुकाचा भाग अधिक असला तरी त्यांच्या अंगच्या अलौकिक रस-ग्राहकतेनें मला कित्येकदां प्रेरित केलें आहे. त्यांचें तें ऋण मी विसरणार नाहीं. ओहोटीच्या घटकेला ओलावलेल्या वाळूंत रेलून मावळत्या सूर्याच्या किरणांत आम्हीं आमच्या श्रमाच्या घटका कितीतरी वेळां रंगविल्या आहेत.

त्यांच्याइतका जरी नाहीं, तरी रसिक वाचकांनीं लाटा-लहरींचा हा विलास जवळून पहावा. जिज्ञासूंच्या जवळिकेनें पहावा अशी माझी त्यांना विनंति आहे. त्यांतील कांहीं लाटांच्या तांडवांत आणि कांहीं लहरींच्या तुषारांत त्यांना 'वेगळें' पणा दिसेल, असा माझा आत्मविश्वास आहे. पण त्याच वेळीं हेंही सांगून टाकतों कीं, मनोऱ्याच्या उंचीवरून त्यांचें दर्शन होणाऱ्या टीकाकारांना किनाऱ्यावरील वाळूंत पडलेला फक्त मीच दिसेन...माझ्या पदन्यासांतील रेषा—वलयांचा सूक्ष्मपणा दिसणार नाहीं.

मग ते म्हणतील...

" कण यांत रुपेरी दिसतो एखादाच
कुणि म्हणावा हवा तर हा प्रतिभेचा नाच
कोठेंही यांत न आत्म्याचा ओलावा
पाचूच्या मोलें तोलुं नये कुणि काच. "

स्वतःला पूर्वग्रहदूषित टीकाकारापेक्षां समजणारा वाचकच आपल्या भावनांशीं अधिक प्रामाणिक असतो असा माझा अनुभव आहे. तेव्हां रसिकांना त्यांत जी रंग-संगति ( विसंगतीदेखील ) दिसेल, तींच माझ्या मानस मेघांतून प्रतिबिंबित झालेलीं इंद्र-धनुष्यें आहेत, असें मी समजेन.

दि. २५-९-५९ प्रफुल्ल-दत्त

लाटा
१
ते
२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २५८४९ वि: ......
क्रमांक १४४३ नों: दि: १८-११-५८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १०५८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

ही घराघरांतुनि हंसते आज दिवाळी
दे जाणिव, " झाली स्वप्नांची तव होळी "
धडपडती तरिही सांगे वेडी आशा
" मी रंगवीन या राखेंतुनि रांगोळी "

झोपड्या हवेल्या न्याहळीत भंवतालीं
तुडविलें तयानें त्रिखंड पायाखालीं
तो वदला पुसतां अनुभव जिज्ञासूनें
" पेटली चहुंकडे मानवतेची होळी "

लाटा
आणि
लहरी

शैशवीं हंसें मन कुणाकडेहि बघून
यौवनीं बसें तें शोधित अपुलें न्यून
व्यक्तित्व ठसविण्या वांछितसें प्रौढत्वीं
ग्रासितां जरा त्या भासें जीवन शून्य

वाचनालयीं वाचिले कितितरी ग्रंथ
विद्वान म्हणुनि मिरविले चारचौघांत
परि पुसतां माझा बाळ प्रश्न एखादा
ये कळुनि, किती विज्ञान - विश्व अज्ञान

" सस्यमयी सुफलां अमुची भारतमाता "
संपली सभा ह्या गाउनि परिचित गीता
श्रोत्यांतुनि आले शब्द कुठुनसे कानीं
" अर्थाविण अजुनी पढतो आम्हीं गीता "

ह्या ब्रह्माण्डांतिल प्राशिलेंस तूं वीषा
लाभलें तयाचें तुजसी मोल गिरीशा !
सोसुनी जन्मभर हालाहलसम क्लेश
दृश्यरूप होति न कितिकांच्या परि आशा

राहवें न म्हणुनी, लिहिली रोज तयांनीं
हळुवार करें अश्रूंची करुण कहाणी
बरळले, रंगले रसिक - राज मधु - पानीं
द्या फेकुनि, जगता नकोत हीं रडगाणीं

शोषून जलधरा उदधीचें सामर्थ्य
अंबरीं निनादत गाजविसी पुरुषार्थ
तव वैभव पाहुनि वाटे तप्त धरेला
" हृत् शमन कराया माझें हाच समर्थ "

लाटा ९ ते १४

कविराया, अपुलीं गा ओजस्वी गाणीं
अवकाश भरूं दे, तुझिया नव-गीतांनीं
पडसाद तयांचे उठतां दिक्कोनांत
भवितव्य तुझें ही उद्गारिल जनवाणी

गोपाळ घ्या कुणी, घ्या हो कुणि गोविंद
ओसंडत होता माजघरांतुनि मोद
बैसली कुणितरी निपुत्रिका बाजूला
तिज यावी कैसी अव्यक्तांतिल साद ?

कसल्यातरि धुंदींत करितो मानव पाप
क्षण ओसरतां त्या होई पश्चात्ताप
मिळवाया फिरुनी समाधान-सुख-शांति
दगडांतहि पाही परमेशाचें रूप

लिहिलेंस विधात्या एकच तूं हें गीत
तारका-ग्रहांच्या तेजस्वी शब्दांत
वाचितां प्रत्यहीं तिमिरीं तें एकांतीं
वेगळा तयांतुनि होई भाव प्रतीत

लावून गंधअक्षता, वाहुनी सुमनें
मीं तुझी आरती केली उत्साहानें
त्या ब्रह्मसमाधीमधुनी येतां जाग
माझ्याच भक्तिचें ऐकियलें मीं गाणें

अंथरून त्यानें मार्गीं अपुल्या कांटे
पांथस्थां नेउनि सोडियलें सत्पंथें
जाहली तयाच्या खिळेठोक तरि माथीं
संतांचें जीवन जगाहून उफराटें

अस्मान बोलवी वर वर मानव-ध्येया
विसरून पिपासा भूक आणखी काया
जातांना वरि तें, बोले हळुंच जमीन ळाटा
ये कधिंहि, आसरा देइन मम वक्षीं या १५ ते २०

एकदांच होतां वर्षाऋतुचा स्पर्श
तो निर्झर झाला स्वर्गाला आदर्श
ग्रीष्मांत तडकुनी होतां हृदय विदीर्ण
कुणि पाहि न त्याचें भग्न स्वरूप हताश

शिशिरानें होसी कंपित काय मृणाला ?
मुग्धेसहि छळिती अशाच गे खल-लीला
विकसल्या दलां तव सुखवित मधु-लहरीनें
येईल प्रियसखा वसंत फुलवायाला

मानवी मन कधीं येतां संत समीप
करि खुलें आपुलें बंधन आपोआप
चुंबिते जेधवां गिरिशिखरा घनमाला
निमिषांत होतसे हृदय तिचें द्रवरूप

नवरंग जमवुनी अंतरिंचे मेघांच्या
रवि प्रतिमा रेखी काय उषा-संध्येच्या ?
जुळली न संगती आवडत्या रंगांची
भ्रमतसे म्हणुनि हा चिंतनांत प्रेयाच्या

कळला न कुणाही आकाशाचा अंत
का चंचलतेला कळतें हृदय अनंत ?
मार्तंड-शरें परि विव्हळ होतां धरणी
ओथंबुनि, स्त्रवुनी ये तें जल-धारांत १० : ११

क्रमांक ९८४५ ...... नों: दि:

ळाटा २१ ते २६

पसरून मोहमय जादूचें करजाल
स्वप्नाळू करि जग चंद्रतारका लोल
  आवरून त्याचें विरल धुक्याचें वस्त्र
करि कार्यक्षम रवि, जागवून भूगोल

चिरकाल रहावी असूर्त प्रीति विशाल
बांधिला शहानें म्हणुनी ताज-महाल
  खोदिलें जयांनीं अमर परि तें शिल्प
स्वप्नींहि न घेई नांव तयांचें काळ

गर्जला अखेरीं भक्तांचा मेळावा
" क्षणभरी तरी दे दर्शन आम्हां देवा "
  उंबऱ्यांत हरिजन कण्हला, " देव न येथें
करि जोंवरि मानव बंधु-बंधुचा हेवा "

माझेपण ओतुनि करितां तूं गृहकार्यें
सौंदर्य दिसुनि ये तुझें तेधवां, आर्यें !
  लालित्य खेळतें घरभरल्या आनंदीं
मानसांत हंसी जेंवि निर्मिते वलयें

भांडार जयाचें मोत्यांचें नवलाख
जो विश्वाचीही शमन करितसे भूक
  तो सागर, त्याचा पुत्र शंख कोठेंही
भिक्षेस्तव फिरतो चर्चुनि अंगीं राख

येणार आज ह्या बाजूनें सम्राट
वाढला म्हणुनि हा हमरस्त्याचा थाट
  लोटलें पहाया सम्राटा जग सारें
घे मानवतेची चाहुल पाउलवाट

भुलविते मानवा कांता-कांचन-कीर्ति
बेचैन करी मन त्यावरली आसक्ति
“ निष्काम असें हें माझें जीवित-कार्य ”
संतही न वदले गिरि-कुहरीं एकांतीं

ळाटा २७ ते ३२

गुंतसी मना तूं कसल्यातरि व्यापारीं
फसशील परी ह्या स्वार्थाच्या बाजारीं
मिळणार न तुजला देउनि मोल हवें तें
व्यवहारें भरली येथिल दुनिया सारी

घे दीर्घप्रयत्नें साधुनि अपुलें ध्येय
जगिं बलवन्ताही यत्नाविण ना श्रेय
नच मिळे हवें तें सहसा स्वप्नाळूंना
रे दैवाहातीं दुबळ्यांचें भवितव्य

तिमिरांत जातसे काळ न हा मम वाया
शांतता अशी ही हवी मना विकसाया
उत्फुल्ल प्रभातीं होतां दलसंभार
येतील थवे मधुपांचे रस सेवाया

प्रतिदिनीं उमलतें वेलीवर नव फूल
कवि-हृदय विकसवी क्षणाक्षणा नव बोल
तुजजवळि विधात्या असुनी कल्पकता ती
कां दाविसी आम्हां तेच तेच ग्रह-गोल ?

मम जीवन असुं दे होमकुंड धगधगतें
वेंचीन प्रसंगीं प्राणहि फुलवाया तें
रक्षेंत सांठला आकांक्षेचा अंत
जाणितो, तरीहि न वाटे खंत मनातें

१२ : १३

लाटा
७७
ते
७८

हा मानव निर्मिल भूवरिं अपुल्या स्वर्ग
या हेतुनेंच दे जीवन त्यास निसर्ग
स्वार्थांध परंतू होतां मन मायेनें
बंधूसहि दे तो असुरासम उपसर्ग

पूजनास तुझिया अशीच देवि यशोदे !
मम हृदयिं अहर्निश भाव-सुमें उमलूं दे
वेंचिल्या फुलांची तुला वाहतां माला
दरवळुनी जाइल मानस तव सौगंधें

वलयांकित करुनी तुज अपुल्या लहरीनें
आलिंगुनि, चुंबुनि सांगे सागर स्वप्नें
सांभाळ परी तें नौके हृद्‌गत पोटीं
स्पर्शितां किनारा प्रस्फुरशिल हर्षानें

तूं माळिण प्रतिभे, फुले तुझा हा बाग
जिंकिला फुलांनीं यांतिल तव गे राग
चिंतनीं गुंगुनी व्यर्थ अतां शून्याच्या
ये विश्वावरती उधळित पुष्प-पराग

मधुपानीं सरलें आयुष्यांतील वर्षे
तरि जीवित-पेयांतून उसळतो हर्ष
साल्गिरा साजरा करितां औदार्यानें
करि जरा भंवतिच्या मानवतेला स्पर्श

जन्माचा जडला जया कलेचा छंद
तो लुटितो एकांतांत खरा आनंद
कमलांच्या कोषीं स्वयें कोंडुनी काया
गुंजारव करितां मधुप होतसे गुंग

कल्पना चितारी मनीं हवें तें दृश्य
प्रतिबिंबित होई अपुलें ज्यांत भविष्य
 उपहासें सांगे सत्य जगा, “ हा भास
कधिं येइ न हातीं धरितां इंद्र-धनुष्य ”

तरळसी विचारीं जलदा कां ह्या व्योमीं ?
“ क्षणभंगुर जीवन योजुं कुणाच्या कामी ? ”
 औदार्य नियोजी स्थान तुझें अस्मानीं
मानास्तव गर्जे इथें जगाचा स्वामी

ये प्रतिभे उजळित चराचराची सृष्टी
स्फूर्ति तूं तेज तें नाचवीत ये ओठीं
 हृद्‌भाव, कल्पना ओतितील छंदांत
वैशिष्ट्य व्यक्तविल त्यांतिल मम अनुभूती

पंकांत रुते हा चरण तुझा राजीवा
रवि-प्रतिभा फुलवी तरिही तुझिया जीवा
 मानवता न्याया मिळवायास अनंता
कुलशील अभेदें करिति महात्मे सेवा

संपतां निशा ही उघडी पूर्वा द्वार
जागत्या जगाचा करावया उद्धार
 तिमिराचे विरतां पाश, उठुनि उत्साहें
कर्तव्य जाहलें नव-किरणांवरि स्वार

बांधून आपुल्या काळ-यंत्र मणिबंधीं
रोधूं न शके कुणि क्षणहि काळ स्वच्छंदी
 जो, लहरीवरती नाचवि जीवित-नौका
उसळतां, तयाला काय किनारा रोधी ?

ळाटा ३९ ते ४४
१४ : १५

लाटा
४५
ते
५०

" कुणि घेइल हातीं यापुढती मम कार्य ? "
अस्तंगत होतां सहजचि वदला सूर्य
सौजन्यें वदली पर्णकुटींतिल पणती
" स्वीकारिन जोंवरि स्नेह अंतरीं, आर्य ! "

जिंकाया जातां अंतरिंच्या आकांक्षा
कां तमा जिवाची माझ्या होइल रक्षा ?
झुंजार, खेळतां प्रतिपक्षाशीं झुंज
भीरुतेहुनी स्वीकारिल समर-विनाशा

" मम मुठींत राही विश्वाचा संहार "
म्यानांतुनि वदली डौलानें तरवार
परिसुनि हे वदली देव्हाऱ्यांतिल गीता
" मुक्तीस्तव त्याच्या घेइन मी अवतार "

कधिं शांत होउनी मन्मन जनसंमर्दीं
हें जीवन जगतां, मूल्य तयांतिल शोधी
उठवितां अंतरीं वादळ कधिं एकांत
आवरितां येइ न अविचारांची गर्दी

स्वप्नांचें गुंफुनि अपुल्यांभंवतीं जाल
मन जीवन कलहीं राही धुंद खुशाल
झुंजतां तयाचे तुटुनी दुबळे धागे
बैसतो जिव्हारीं घाव, होइ घायाळ

वाढत्या वयाचा सांगे क्षण एकेक
' ध्येयाची प्रतिमा काळ-शिलेवरि रेख '
अंतर्मुख मन हें म्हणतें, " स्वस्थ रहा तूं
" होईल उद्यांच्या उदरिं तियेची राख "

लाटा
आणि
लहरी

ओथंबुनि ये हा मेघ शिरावरि तुझिया
पथ आक्रमीत चल त्वरित अतां खगराया
मज तरी दिसे हा प्रलय-कालिंचा मेघ
जो दूरवील तव अनंतांतल्या ध्येया

ळाटा
५१
ते
५६

" माझ्याच पित्यानीं बांधियला हा वाडा "
मजुराचा वदला पुत्र उपाशी उघडा
कुणितरी वाहनांतून उतरुनी खालीं
खेकसलें, " चल हो, दूर येथुनी, वेडा ! "

असहाय तपें धरणीचें फुटतां ऊर
तरळत्या घनांचा काळवंडला नूर
अवतरले खालीं हृदय तिचें शमवाया
चंचलही जाणी कामिनिचें काहूर

राहिला उभा ढग एकलाच दिक्कोनीं
मुनिं जेंवि तपस्या करितो निर्जन रानीं
अंधाऱ्या रात्रीं तिळही नच ढळला तो
त्या तेजाळित ये प्रकाश नव-किरणांनीं

बेफाम दौडतां ध्येय-रथाचे अश्व
मज गमलें भ्रमतें भंवतालींचें विश्व
परतलों जिंकुनी आज अखिल सम्राटा
शांती न लाभुनी क्षितिजाचें स्वामित्व

खदिरांगारासम जळला तो शतवर्ष
तेजास तयाच्या कुणिहि न केला स्पर्श
दीप्तिमान त्याची जळली तनु एकाकी
संघर्षावांचुनि कधिंही नच उत्कर्ष

१६ : १७

ळाटा
५७
ते
६२

यंत्रांची घरघर ऐकुनि दिवसांरात्रीं
ढळली मजुराची त्या, आत्म्याची शांती
संभ्रमांत असतां आणिक एकदिनीं तो
लाभली तयाला यंत्रांतच विश्रांती

पोटास्तव जग हें दिनभर वणवण धांवें
श्रमतां तें रजनी तुझ्या कुशींत विसांवें
परिसून रातभर त्याची करुण कहाणी
कां दंवबिंदूंनीं ऊर तुझें ओलावें ?

आचरण सिंचुनी अपुलें आपुलकीनें
जो रंगवि अपुलीं विचार-वलयीं स्वप्नें
समरूप तयाचें होतें चित्त कुठेंही
त्या आत्मविकासा नकोत पूजास्थानें

वेंचिलें जयांनीं घटका-पळ परमार्था
तुकयाचा इंद्रायणींत तरला गाथा
जा, तरेल फेंकुनि द्या कुठल्याही डोहीं
अनुभूतींतुनि जी छंदमयी हो कविता

गिरिपाशीं अपुलें करुनी जल स्वाधीन
निमिषांत होतसे गगनीं मेघ विलीन
खेळवून त्याचे जागोजागीं पाट
गिरि सहज मिळवितो औदार्याचा मान

क्षण चार-दोन कधिं मिळतां स्वर्ग-सुधेचें
लावण्य प्रत्यही वाढे गंधवतीचें
ऋतु सरतां होई सुफला श्यामलता ती
स्नेहाविण निष्फळ जीवन कामार्तांचें

लाटा
आणि
लहरी

" निशिदिनीं रहा तूं प्राशित जीवित-सार
नाचवी परी मज नाण्यांचा झंकार "
" तूं जगसी मित्रा केवळ उदरंभरणा
मी जगतां जगविन मूल्यें माझीं प्यार "

ये कधिहि न्यावया काळा मदेहातें
झुंझार मना तूं शक्त न जिंकायातें
वटवृक्ष मुळांतुनि उखळी वादळवारा
येई न खुडाया तया तृणाचें पातें

" कवि तुम्ही दवडितां उगाच काळ अमोल "
बोललें कुणितरी सुटुनि जिभेचा तोल
जाणील केंवि तो, रमला जो व्यवहारीं
होतात उद्यांचे शिलालेख कविबोल

विसरुनी जगाचें स्वार्थी अंग उपांग
अपुल्याच विचारीं तुकया झाला दंग
चिंतनीं दिसुनि ये प्रतिभेचा उन्मेष
म्हणुनीच तयाची वाणी अजुनि अभंग

सौंदर्य प्राशुनी रात्रंदिन विश्वाचें
वाढविलें वैभव आजवरी आत्म्याचें
उसळतां अंतरीं विचार-वलयें केव्हां
चैतन्य छंद-मय होउनि अधरीं नाचें

लोटीत पंच-पक्वान्नें अपुल्या पोटीं
ते बोलत होते नियंत्रणाच्या गोष्टी
रंगतां वाद, कुणि वदला मंत्री त्यांत
" कंगाल कितिक, " तों आला ढेकर कंठीं

ळाटा
६७
ते
६८

१८ : १९

लाटा
६९
ते
७४

पूजिला जनें तो समजुनि जीवानंद
त्यानेंही कितिकां दिधले आशीर्वाद
येतात समाधींतून तयाच्या, कानीं
आमरण सोसल्या स्त्री-विरहाचे साद

पढवितां मुलांना पाढे बेकंबेचे
उजळिलें त्यांचिया सवें मीहि परवाचे
पांखरेंच तीं चिवचिवुनी उडुनी जातां
मन जडावलें करि गणित नभीं शून्याचें

जवळूनि न्याहळुनि जीवन माझें सारें
पुशियलें कुणी मज, " जगसी यांत कसा रे ? "
मी वदलों, " माझें जीवन निर्झरनृत्य
पाहून जया तृण तीरावरिल तरारे "

पद तुझें जोंवरी खिळलें मनुजा भूस
तोंवरी कृतीनें लाजविशील प्रभूस
मातींतच रुजतें स्वर्ग-सुखाचें बीज
पुरुषार्थ बोलका करि मातीची कूस

मार्तंड दिवसभर कर्तव्याचा बंदी
शशि कलावंत परि पूर्णपणें स्वच्छंदी
सेवेंत रमे जो, खडतर जीवन त्याचें
भोगांत असे जग विस्मरल्याची धुंदी

" गीतस्वर माझे फुलवितील पाषाण
देतील धरेला दयाघनाचें दान "
कैफांत गात कवि होतां, रंगत होतें
संध्येच्या किरणीं अभ्रांकित अस्मान

लाटा
आणि
लहरी

दिन कलला, कलली छायाही पूर्वेस
लागली दिसाया दूर मृत्युची वेस
केलास येथवर जीवा खर्च अमाप लाटा
येथून पुढें तरि कांहीं ठेव जमेस ७५
ते
शब्दांचे नूपुर रुणझुणतां चरणांत ८०
भावार्थ हृदींचा थयथयतो छंदांत
नयनांत रंगते क्लृप्ती मग अनुरागें
झंकारे जीवन-नृत्य रोम-रन्ध्रांत

अनवाणी चालत होतो चिंतित ध्येय
झोळींतिल सरलें होतें जरि पाथेय
उधळीत धूळ कुणि वाहनांतुनी जातां
उत्साह निमिषभर गळला, थकले पाय

रंगाया तांबुल कात हवा पानांत
रंगाया मैफल भाव हवा गानांत
मकरंद हवा पुष्पांत मधुप रंगाया
रंगाया जीवन हर्ष हवा दानांत

हा राव आणि हा रंक, ओळखि न काळ
इवल्याशा पुंगीवरती डुलतो व्याळ
हवि स्वर-वलयांची किमया ओंठांवरती
भगवंत जाहला बंसीधर गोपाल

हा घटकेघटकेसाठीं जगतो देह
त्यानेंच बांधिलें आत्मविलासा गेह
मन विरतें येथें, कधिं मुक्तीस्तव स्फुरतें
जायचें कुठें परि हाच तया संदेह

हातून घडावी सरस्वतीची सेवा
जमविला सखींचा म्हणुनि तिनें मेळावा
संपतां सभा, मज दिसल्या मुंग्या कांहीं
गालिच्यावरिल पेलितां शिरीं मधु-मेवा

दा. क्र. २०५३

वेतापरि लववित चाले भूत-भविष्य
आदर्श जगाला तयाचेंच आयुष्य
वेलीपरि लववी वर्तमान इतरांना
बिंदूंत जयांचें जीवन-इंद्र-धनुष्य

जा कविते ! आतां सन्निध तूंहि नकोस
रंगविण्या अमुच्या संगमिंचे उन्मेष
कधिंही न यापुढें माझी जी ललितांगी
परिसुनी काय सुख ते लावण्य-विशेष ?

दशलक्ष ब्राह्मणां घालुनिया पक्वान्नें
फेडिला तयानें नवस, जोडिलीं पुण्यें
पूजुनी देव परततां, पथीं दिसलें त्या
किति अपंग चाटित होते पडलीं पानें

तुमचाच जरी मी तुमच्यापासुनि दूर
तुमच्याच दिलाचे जुळवि विलगले सूर
ऐकतां उद्यां ते, म्हणाल, " अगदिं असेंच–
वादळलें अमुच्या हृदिं कितिदां काहूर "

चढ-उतार अविरत तिमिरांकित भवताल
आमरण असूं दे अशीच ही पथचाल
विस्मृतींत विरला माझा भूत-भविष्य
जागेन, जोंवरी वर्तमान दे ताल

गिरि-शिखरीं धारा-नृत्य बघुनि वरुणाचें
फेंसाळें जीवन दऱ्यांतुनी सरितेचें
उन्मेष उरींचे तिचिया ते कवळाया
उल्लंघुनि अपुली सीमा, सागर नाचे

मौनांतच मी, पाषाणीं जेंवि अनंत
संकोचें, तरि मम स्पर्शी भाव दिगंत
शब्दांत कधीं मम मौन बोलकें होतां
मन गात भरारत विरे निळया विश्वांत

संगमोत्सुका तूं होसि धरे मधुमासीं
तापसी तडकसी ग्रीष्मीं व्याकुळ होसी
वर्षेसह येतां भेटायास पयोद
उतटुनी हृदय, त्या आलिंगाया स्फुरसी

चिंताग्नी जेव्हां जाळित ये एकांत
आराम-आसनीं बसतों मी ध्यानस्थ
हीं अग्निफुलें मम करीं त्याच घटकांचीं
ज्योतीपरि फुलतीं जीं जीवनतिमिरांत

वसुधेचें प्राशुनि पय हा मेघश्याम
चैतन्यें धांवे व्यापित गगन असीम
विव्हळतां परी ती ग्रीष्मांतिल रवि-तापें
फेडितो पुत्रऋण ओतुनि अंतर्याम

विद्वान दोन ते बोलत होते गोष्टी
संस्कृती रंगली होती त्यांच्या ओठीं
फुटलेलें पाहुनि दृष्टिसमोर गटार
वळवळलीं किल्मिषें बहु दिवसांचीं पोटीं

ळाटा
८७
ते
९२

नच पतन तुझ्या हें जलधारांचें स्वाती
पतनांतच ह्या तव होइ मनीषा-पूर्ती
सागरीं कुठेंतरि असेल दडली शुक्ती
जी झेलिल त्यां अन् होतिल त्यांचे मोती

लाटा
१७
ते
१८

वेणूनें अवघें गोकुळ वेडें होतां
श्रीहरिची जगता रुचली भगवद्गीता
बळ मुठींत ज्याच्या लाखांच्या आत्म्यांचें
भगवंत तोच, नवसूक्तांचा उद्गाता

मेघांनो ! भूवरिं पडुनी धारातीर्थीं
वेंचितां आपुलें जीवन तुम्हि परमार्थीं
स्पर्शानें तुमच्या मृत्तिकाहि हिरवळते
दानांतच तुमच्या चराचरांची पूर्ती

परहितकार्यीं रत मनुजा ज्या न उसंत
ज्या स्तुति-निंदेचीं कधिं न वाटली खंत
बांधितो तयाची चित्तीं काळ समाधी
अंतरिंच्या उत्कटतेंत वसे भगवंत

ही धूळ माझिया पाउलवाटेवरली
मज म्हणे, " तुझीं पद-चिन्हें मीं उरिं धरिलीं
कुतुहलें दर्शना तुझिया येती जे जे
त्यावरुनि तयांनीं वाट तुझी अनुसरली "

हें फिरतें अविरत कालचक्र ब्रह्मयाचें
अन् गणित कोणतें मनिं तुझिया शून्याचें
हातांतिल ओली माती नच जों सुकली
नव-कुंभ तिच्यांतुनि घडवि तुझ्या स्वप्नांचे

भंगतो जयाचा विश्वोद्धारा माथा
कालौघीं तरतो त्याचा जीवन-गाथा
  हा देह कधिंतरी आज उद्यां जायाचा
शतकांतुनि जागे आत्म्याची उत्कटता

लाटा
९९
ते
१०४

पसरला दूरवर अथांग काळ-किनारा
किति आले आणिक येती येथ विहारा
  शोधून पदांतीं अनुभूती पुढल्यांची
चालती मागले कवळित सुख-संभारा

लागलें, लागुं दे, तुझें पुरेपुर वेड
मग मिटेल जीवन्मरणाची तरि तेढ
  मातींत चिमुटभर पडेल भर मरणानें
जगलों तरि रोविन कुल-वंशाची मेढ

सागरा, मेघ हे तुझेच ना अवशेष ?
कां स्वाति-सरींचा करिसी मान विशेष ?
  उत्कंठ तुला बिलगाया अवघ्या धारा
कवळिसी केंवि मग तयांचेच उन्मेष ?

शास्त्रज्ञ बैसती तोलित अणुसामर्थ्य
मुत्सद्दी आणिक शब्दांतिल गूढार्थ
  उद्भवतीं युद्धें जेव्हां त्या संघर्षें
त्या विझवि दयाघन-संतांचा परमार्थ

शब्द-बद्ध ज्यांची जीवनिंची अनुभूती
मानिती जन तयां शतकांतींहि विभूती
  तेंच खरें अक्षर वाङ्मय सामान्यांचें
वाचनीं जयाच्या मिळे जिवा विश्रांति

लाटा
१०५
ते
११०

जरि कळलें मनुजा अनंत भूत-भविष्य
अधरिंचें तयाच्या विरेल जीवन-भाग्य
आयुष्य मानवी बिंदु-तुल्य कालौघीं
अन् सौख्य तयांतिल घडिचें इंद्र-धनुष्य

विजिगीषू मानव उरिं भरल्या आशांनीं
आवेशें पेलित दुःखें, गातो गाणीं
विरतात तयाचे श्रम ध्येयासक्तींत
उजळती तयाच्या दिशा नवोन्मेषांनीं

उपजतांच भिडली मार्तंडा ग्रासाया
ही दीपशिखेसम हनुमंताची काया
श्रीराम तयाच्या येतां थकल्या नेत्रीं
लतिकेसम लवली श्रद्धा पद कवळाया

शिर लवलें, लवुं दे अखंड ओझ्याखालीं
गिरि-दरी-पहाडीं असो पथीं घनजाळी
मज तमा न त्याची जोंवरि कविता माझी
झुळझुळत्या हृदिंच्या भाव-जलें हिरवळली

वादळतां मानस कमलें होति विदीर्ण
राहती सुखानें अंतरिंचे परि मीन
प्रक्षोभ उसळतां तेंवि माझिया चित्तीं
जरि अचल विवेकें, होइ विलास-विहीन

कवळून उराशीं स्वप्नांचे अवशेष
धुंडिले तयानें अनवाणी परदेश
तप चढतां चरणांतील तयाच्या ओंठीं
जग डुललें परिसुनि वाणींतिल उन्मेष

भिजवि जो श्रमानें पायाखालिल माती
करि वरुण घनांची छाया त्याच्या माथीं
तप पाहुनि त्याचें, डोळ्यांतील तयाच्या
भगवंत पालवी निरांजनांतिल वाती

ळाटा
१११
ते
११६

आजन्म राहुनी कुडींत ह्या आत्म्यास
पुरतें न कळे, " कां अपुला येथ निवास "
कर्तव्यमूढ तो होउनि म्हणुनी केव्हां
तडफडे, म्हणे, " हा जळुं दे कारावास. "

चांदण्यांत भिजतां माझी गीत-लकेर
शब्दांकित होती भाव मनांतिल स्वैर
मग स्वप्न-फुलें अधिरंती चरण चुंबाया
धरि तारांगणही शब्दांभवतीं फेर

युगयुगें जगुनि जग झालें नाहिं पुराणें
वृद्धत्व न जोंवरि ब्रह्मानंदीं रमणें
अर्पिलें आजवर त्यानें मनुजोद्धारा
काळास थांबवुनि चिंतामणि-नजराणे

वर्षानुवर्षं जी पडूनि राहि मलूल
नभ आक्रमिते ती झंझावातें धूळ
प्रक्षोभ पुरे घटकेचा आत्मोद्धारा
जागता हवा परि भाव उरीं निस्तूळ

आमूल बहरली माझी अक्षरवेल
आजच्यापरी ती कल्पांतींहि फुलेल
रसरसली अनुभूतीच्या ओलाव्यानें
आकाशहि तिचिया गंधें भारावेल

लाटा
११७
ते
१२२

बैसतां तपाला माध्यान्हीं मार्तंड
जाहलें तयाच्या तपें चराचर चण्ड
तृण-पातें नमलें निमिष आणि प्रस्फुरलें
" हा श्रमे निरंतर जागविण्या ब्रह्माण्ड "

संतप्त धरेच्या पोटीं हिरवीं स्वप्नें
अतृप्त जिवाच्या ओठीं स्फुरतें गाणें
आकंठ लाभतें जेव्हां ज्यास हवें तें
कोणते जगा तो देइल नव नजराणे ?

मन अनुभूतीरत असतें जेव्हां माझें
नव उन्मेषांचें थुयथुयतें कारंजें
मुक्तिच्या बंधनीं विरतां लौकिकपाश
शब्दांच्या ऊर्मित अधरिं भावना गुंजे

कधिं कुठें कशानें स्थगीत जीवन होतां
स्थिरतेंत विसावे अंतरिंची अवखळता
बुडबुडे तळींचे येति स्मृतीचे वरती
अन् विरे पुनरपी अधरींची नीरवता

हें गगन कर्मभू जळत्या मार्तंडाची
ब्रह्माण्ड युगयुगें जागवित्या वीराची
सत्कार कराया त्याचा काय निशा ही
पथिं हर्षोन्मादें उधळि फुलें तारांचीं ?

लाटा
आणि
लहरी

मिसळती हवेमाधिं तुमचे-अमुचे बोल
तरळत्या पिसापरि ज्यांतिल भाव विलोल
रंगलें चिंतनीं सत्-चित्-आनंदीं जे
शब्दांवरि त्यांच्या नाचतसे भूगोल

अभिमानें म्हणतों जें मी माझें माझें
सुहृदांचें माझ्या त्यांतच प्रेम विराजे
गतिमान धरा ही राहति अंधारांत
रवि शशी नभीं जर नसते तळपत तेजें

जोंवरी चाललें आवर्तन पृथ्वीचें
होईल तोंवरी दर्शन नव-क्षितिजांचें
गतिशून्य चिंतनें ध्येय न येई हातीं
त्या हवें समीक्षण नित जीवन-मूल्यांचें

ग्रीष्मांतिल शोषुनि पहिली धार मृगाची,
हो पुलकित काया थकल्या गंधवतीची
हिरवळते स्थिरतां पोटीं बीज जगाचें
षण्मासें चढते कांति मुखीं मातेची

मी मुग्ध आजवरि स्वरूप मम अज्ञात
गावया थोरवी मजपाशीं नच भाट
शारदे ! तरी तव करितां निरलस सेवा
व्यक्तित्व कुणितरी जाणिल, काळ अनंत

आकंठ सेवुनी पक्वान्नांचे घांस
उचलिली तयांनीं उच्छिष्टांची रास
ते हवेलींतले झेलाया अवशेष
श्वानासम उठले दारिद्र्याचे दास

" खाऊन दिवसभर मेल्यांना ये मस्ती "
आजीव बोलली चिडुनी दशपुत्रा ती
कैलासीं जातां माउलिचा त्या प्राण
गंगेंत सोडिल्या चिरंजिवांनीं अस्थी

छाटा १२३ ते १२८

२८ : २९

दृक्क्षेपें शोधुनि शिलेंत अक्षर भाव
शिल्पकार रंगे घालित तीवर घाव
उतरतां मनींचें प्रत्यक्षांत परोक्ष
किति येति पहाया मानव-निर्मित देव

लाटा १२९ ते १३४

द्यावया जगा जरि मजजवळी कांहीं न
देतसे परी तें म्हणेल कुणिहि न हीन
करभार जयांचा झाला हलका दानें
औदार्य गात आजीव ऋणी राहीन

आत्म्यानें माझ्या करितां देहप्रवेश
जाहली खुली मज ब्रह्माण्डाची वेस
स्वच्छन्दें विहरत नाद-रंग-रस-गंधें
वेंचिलें आजवरि हें सौंदर्य-विशेष

मीं लिहिलें तेव्हां छंदांच्या नादांत
मीं लिहिलें तेव्हां कीर्तीच्या कैफांत
मज न कळे लिहितों आज कुणासाठीं मी ?
परि लिहितों, जेव्हां भाव घुमे हृदयांत

सुख हवें म्हणुनि जें धडपडलों अश्रांत
सुख हवें म्हणुनि जें तळमळलों दिनरात
तें मिळतां, कळलें हें न हवें होतें जें
सुख तया, जयाचें हृदय जळे जहरांत

कर्तव्य उशाशीं रक्षित होतें ठेवा
" हें इथें चिरंतन राहो, " प्रार्थित देवा
संकोचुनि होती उभी पायगति प्रीत
अंजलींत लपवित युगायुगांची सेवा

लाटा आाणि लहरी

दात्यास हवी सघनता उरीं मेघांची
नेत्यास ज्ञात हविं वळणें कालौघाचीं
स्वामित्व जगावरि गाजवि जो भूपाल
दृष्टींत तयाच्या हवी वृत्ति दोघांची

अनिकेत न मी, कवितेमधिं माझा वांस
नित मिळे मला नव अनुभूतींचा घांस
नाण्यांचीं नातीं कधीं न ओळखिलीं मीं
आत्म्यास माझिया अलौकिकाचा ध्यास

कैलासीं विरतां सायंकिरणें क्षीण
काजळली वसुधा होउनि शोकविदीर्ण
नित्यासम लावुनि दीप आपुल्या दारीं
अंधार जागवी स्थितप्रज्ञ अस्मान

सोन्याची काया लाभे जरि विहगास
अस्माना भिडण्या घेइल कां तो ध्यास ?
निस्तेज करी मन सुख-सुमनांची शय्या
उड्डाणावांचुनि कोठुनि विश्व-विकास ?

अनुभवितां जीवन साहिन जे जे क्लेश
राहतील त्यांचे कवितेंतुनि अवशेष
आदळते विरते लाट किनाऱ्यावरती
घन-रूप उरे उन्मेष उरींचा फेंस

तारका न हा, हीं स्वप्नें निशिकांताचीं
वसुधेच्या विरहें व्याकुळत्या जीवाचीं
नावडे तिजसि हा प्रियकर परि स्वभाळू
गुंगवी गिरकवी प्रतिभा तिज सूर्याची

लाटा
१३५
ते
१४०

३० : ३१

लवर्वू न शके ज्या वृक्षा झंझावात
खेळवी खेळण्यासम त्या गज लीलेंत
हेमंत ऋतूमधिं सांचुनिया पाचोळा
खंदकांत त्याचा रुतुनी होई अन्त

लाटा १४१ ते १४६

किति भुलुनि तयाच्या शुभ्र हंससम वेषा
भजनांत रंगले कीं हा पांढरपेशा
भलत्याच ठिकाणीं पाहुनि त्या अपरात्रीं
उशिराच, परंतू कळला त्याचा पेशा

समजुनी न घेतां अंतरिचा भावार्थ
नयनांत शोधिते प्रीती अपुला स्वार्थ
परि विलीन होई भक्ती मानवतेंत
सेवुनी मूर्तिच्या पद-कमलाचें तीर्थ

गाऊन सारखीं कवनें प्रक्षोभाचीं
उसळविल्या त्यानें जनता-सागर-वीची
संहार किनाऱ्यावरला पाहुनि आज
अंतर्मुख झाली क्षणांत वृत्ति तयाची

रवि उकलि पाकळ्या ओतुनि तेजोराशी
कवटाळी पंकज तरि मधुपा हृदयाशीं
जाणिते रसिकता हृदय कलावंताचें
स्वामिनी नव्हे; स्त्री ललित-कलेची दासी

मन भवितव्याच्या रमतां कधिं सहलींत
आशेच्या झुळुकी येति तया फुलवीत
घालितें भुरळ तरळतें स्वप्न एखादें
अन् दृष्टि-पथांतुनि जातां होइ सचिन्त

क्षितिजावर स्थिरतां नजर सांज-समयास
ही उदासीनता व्यापितसे हृदयास
भूवरिं ये प्रतिभा चढत्या चंडोलाची
मिसळीत हवेमधिं मुक्या मनाचे श्वास

~

दिनरात जयाला जनसेवेची आस
वर्तमान योजी जो निज सत्कार्यास
प्राशितो जरी तो हालाहल इहलोकीं
पंखावरि नेइल कीर्ति तया स्वर्गास

~

मन्मना कुठेंही क्षणभर घे विश्रांती
यावया श्रांत गात्रांस तुझ्या नवकांती
उद्युक्त हो परी फिरुनी विश्व-प्रवासा
अंतींच तुला लाभेल चिरंतन शांती

~

विसरसी जेधवां मना तुझें अस्तित्व
तेव्हांच मिळे तुज नूतन जीवन-तत्त्व
खेळते झपूर्झा नित्य जिथें अनुभूति
पाहतें जिथें जग वेगळेंच व्यक्तित्व

~

होउनी शुचिर्भुत शीतल शशि-किरणांनीं
ही धरा डोलवी चराचरा मधु-कवनीं
स्मरणांत नाचतां घटका क्षण दुःखाचे
अश्रूंत रंगवी अपुली करुण कहाणी

~

वीरांनीं होतां तदा सिद्ध युद्धार्थ
गाजविला ‘ हर ’ ‘ हर ’ शब्दीं किति पुरुषार्थ
ते बोल प्रयोजन-समयीं ऐकुनि, वाटे
काळही फिरवितो हवा तसा शब्दार्थ

लाटा १४७ ते १५२

कौतुकें उजळतें जीवन तुमचें-अमुचें
अंगार फुंकितां ज्योत तयांतुनि नाचे
इहलोक जागतो उसन्या स्फूर्तीवरती
स्वर्गांत स्वयंभू परि तें ग्रह-गोलांचें

लाटा
१५३
ते
१५८

निर्मिलेस ना तूं ग्रह-तारांचे दीप ?
वसुधेचें आणिक तेजःपुंज स्वरूप ?
तम उजळाया कां तुझिया भंवतालींचा
वाटतो हवासा नंदादीप समीप ?

जन-हृदयिं शोधुनी सगुणांचे अवशेष
गवसला जयाला जगत्-जीवनीं ईश
तो चढतां चढणी संकल्पित ध्येयाच्या
विश्रमतां होइल, घडिभरही न हताश

हा काल रेखितो आज उद्यांचें स्वप्न
असतील मनींचे भाव ज्यांत संलग्न
परि सरुनी जातां अनुभूतींचे राग
करि प्रतिमा अपुरी आणि जिवा बेचैन

रवि पिता तुझा अन् माता वसुधामाई
म्हणुनीच जलधरा कांति तुला लाधे ही
क्षितिजावर येतां उभवित इंद्रधनू तूं
नाशती दूरितें सकलांचीं लवलाही

भिरभिरसि विहंगा हवा तसा अस्मानीं
झुळझुळत्या वाऱ्यावरि आलापित गाणीं
तापलें आतपें घरटें पृथ्वीवरलें
विस्मरसि जीवन म्हणुनी कां मधु-गानीं ?

लाटा
आणि
लहरी

अनुभूती ज्वालेंतून उसळतां सत्य
• घेतलें लिहाया करिं लेखन-साहित्य
झरणींतुन झरतां अविरत भाव मनींचे
प्रकटलें निळ्या शाईंत सहज लालित्य

श्रोत्यांस पढविण्या नव्या जगाची नीति
किति स्रवली त्याची वेगानें रसवंती
मंद-धी परतलें तसेंच ते माघारीं
आकंठ भरे नच कधिंही कलश प्रपातीं

" प्राशून मद्य हा रोज असे बेहोष "
जनतेचा होता हाच तयावर रोष
धुंदींत परी जें लिहुनि ठेविलें त्यानें
देतात महात्मे तोच जनां संदेश

येणार सुधाकर स्वर्ग धरेचा लाल
तारका अप्सरा म्हणुनी होति विलोल
नाचतां काय रजनीच्या नील-महालीं
गुंगींत गळाले हिरे पैंजणांतील

नव-निर्मितींत जो भोगितसे आनंद
तो कलावंत राहतो अहर्निश धुन्द
नव-क्षितिजें जिंकित वाऱ्यावरति विहंग
विहरतां विस्मरे विश्रांतिल निर्बंध

आसमन्त भरलें ज्यांच्या सौगंधांनीं
सुविचार फुलविले मीं ते मम अश्रूंनीं
तृण उदंड उगवें सहजीं वर्षाकालीं
हो सस्यमयी परि उद्यमेंच ही धरणी

लाटा
१५९
ते
१६४

लाटा
१६५
ते
१७०

नवविचार येतां नाचत दृष्टि-पथांत
कल्पना मनांतिल द्यावयास ये साथ
भावना वाजवी अधराचें अल्गूज
त्या ब्रह्मानंदीं स्फुरें हृदय कवितेंत

फलभारें लवसी वसंतसमयिं रसाला
शाखाग्रीं करिती कूजन कोकिल-माळा
आरती जरी त्या करिती सत् हृदयाची
काव काव करिती सेवुनि काक रसाला

प्रतिभेची त्याच्या एकच होती धांव
अस्मानीं गुंफिन ग्रह-तारांनीं नांव
प्रतिभेस परंतू कधिं न भेटली स्फूर्ति
व्यक्तवी आज तो म्हणुनि कुठेंतरि भाव

लीलेंत आज जें झेली झंझावात
मंदिर तें खंबिर असें खरें पायांत
भक्तांची खिळते दृष्टी कळसावरती
परि घाव घणांचे शीलांच्या हृदयांत

वैतागुनि सोडुनि संसारींचें भाग्य
वरियलें तयानें जन्माचें वैराग्य
कुणि येतां रमणी मागाया वर-दान
तो वदला, " लाभो अखंड तुज सौभाग्य "

लाटा
आणि
लहरी

सांधून कशितरी छकलें मस प्रेयाचीं
बेहोषपणें मी क्रमीन वाट वयाची
थंडींत थिजत अन् भिजत वरुण-वर्षावें
आतपें कढत, जरि अशीच ही जायाची

दुर्वांकुर चिरडित अजस्र पायाखालीं
किति शतकें न कळे उभी शिला ही काळी
जाड्यत्व जाउनी तरिहि वरिल देवत्व
चर्चितां अंध भक्तानें शेंदुर भालीं

लाटा
१७१
ते
१७६

लाटांचे झेलित निमिष-पळास तडाखे
या जलाशयांतुनि काटतेस पथ नौके
चिमण्यांची माया कटिं-पोटीं असतांना
विस्मरे माय रक्तांकित उरिचीं दुःखें

अस्मानीं लावुनि नजर धुंडिसी काय ?
कां दग्ध जिवा हा फुलवायास उपाय ?
घे मिटून डोळे, खोल कवाड मनाचें
उरिं तुझ्या वाजविल अल्गुज तो प्रभुराय

या अष्टदलांच्या नील-विश्व-कमलांत
भ्रमरीपरि राही प्रतिभा मम स्वप्नांत
चंदेरी किरणें आवरितां रजनीनें
तें विरे उषेच्या अखेरच्या घटकेंत

सिंचनें तुझ्या मम भाव-फुलें फुललीं हीं
चिंतनीं तुझ्या नित सखि मम सान्निध राही
सामर्थ्यें तुझिया नमविन चरणिं भविष्य
जो देइल माझ्या महत्पदाची ग्वाही

शेजेस अंथरुनि कल्प-सुमांच्या राशी
दिनरात धुंद मी विस्मृतिच्या करपाशीं
तें नेणिवेंतलें स्पंदन उरिंचें माझ्या
गीत-बद्ध होइल, रिझविल रसिक-जनांसी

लाटा
१७७
ते
१८२

कालौघीं फेंकुनि दिलें जिवाचें ओझें
स्वच्छंदीं हलकें झालें जीवन माझें
फुलवितो अहर्निश दिगंतरींची सृष्टि
भ्रमरीपरि ज्यांतुनि मनोभाव मम गुंजे

आदर्श हवा उतराया आचरणांत
गुणगान घुमाया हवें अंतरंगांत
मूर्तीविण रंगे भक्ति कुठेंहि जयाची
परमेश पहा त्याचिया भाव-स्पर्शांत

कधिं अंगारापरि राखेंतिल हा काम
वणव्यापरि व्यापी अवघें अंतर्याम
विध्वंस पाहणें मग उघड्या डोळयांनीं
शून्यांत तयाच्या प्रक्षोभास विराम

मावळलें मंडळ दृष्टिपुढें तारांचें
तरि अचल राहिलें आसन कविरायाचें
उमललीं ख-पुष्पें स्वर्गंगेच्या तीरीं
जाहलीं तयाच्या भूषण नव-कवितेचें

मम कविता हरिची राधेवरली भक्ति
कालिया-शिरींची जहर-विनाशी शक्ति
गोपींच्या उरिंची कंचुकिची निरगांठ
वा भगवंताची पार्थावरली प्रीति

वरिलेंस मौन, तरि भाव झरे तव नेत्रीं
हिमगिरीदरींतुन जेंवि झरे गंगोत्री
प्रौढत्वीं होतां विशाल भाव-प्रवाह
जग भंवतांतिल तव फुलेल जीवन-पात्रीं

लाटा
आणि
लहरी

निद्रांकित होतां सारेजण आळींत
मी निशाचरापरि बसे दिवा जाळीत
काजळून जातां तक्तपुशी ज्योतीनें
येतात भाव शब्दांना कुरवाळीत

हा दिवस कसातरि सरे वाटचालींत
थोरांची जीवन-प्रचिती पडताळीत
ये हिणवित सन्ध्या, "खुजा तूंच सर्वांत"
शब्द हे राहती रात्रभरी जाळीत

हे धनिका, भिडला तुझा नभा प्रासाद
कलषांत भिजे नित येथें कंकण-नाद
परि याद जरा तरि ठेव वयस्यांची त्या
वर चढतां दिधली तुला जयांनीं साद

भरतीच्या लाटा उधळित येति तुषारा
तृप्तींत भिजे हा अबोल म्हणुनि किनारा
नजरेंत नृत्य नित निळावंतिचें ज्याच्या
उरिं झेलिल कां तो घटकेच्या घनधारा ?

प्रतिदिनीं उठोनी निघतां रम्य पहांटे
सहजींच वाट ही जाइन चढुनी वाटे
मंदावे आतां दृष्टी क्षितिजावरली
नियतिनें पसरिले रुततां पायीं कांटे

मधुमासीं घडतां इष्ट स्नेह-संबंध
अंकुरे धरेच्या हृदयिं नवा अनुबंध
उदरांत उतरली जीवनिंची उत्कंठा
दरवळला ग्रीष्मीं मृत्तिकेंत सौगंध

लाटा
१८३
ते
१८८

लाटा
१८९
ते
१९४

पदव्यांचें शेपुट येतां त्याच्यापाठीं
लाविली घरावरि त्यानें अपुल्या पाटी
नव्हता घरिं सहसा, दिवसरात्र बाहेर
राबवीत अपुली विद्या पोटासाठीं

जें कणाकणांतुनि जळतें, तें हिरवळतें
जें दलादलांतुनि फुलतें, तें दरवळतें
डोळ्यांत ध्यास, कंठांत प्यास, उरिं आस
जें जागवि, त्यास्तव दिगंतही हळहळतें

भंवताल विसरतो माझ्यासह जेव्हां मी
मम भाव-विवशता गुंजे अंतर्यामीं
अन् घटका घटका रंगुनि काव्य-विलासीं
शून्यांत हरपलें स्वप्न शोधितों व्योमीं

कधिं तास तास निष्क्रीय दिसें मी स्तब्ध
मिळवीत आणि जुळवीत हवे ते शब्द
हें गणित असें मम काळ-काम-वेगाचें
ह्या जन्मिं जयाचें उत्तर ना उपलब्ध

भावांत स्थिरें अस्तित्व जरी देवाचें
पाषाण पूजुनी, शिणविसि कां मुख वाचे ?
अंतरिंच्या कोनीं केंद्रित होतां भाव
मन मंदिर होइल तुझें विश्व-नाथाचें

जायचें असो मज कितिहि दूरच्या ठायीं
लाटा — मी असाच जाइन अनुभूतींच्या पायीं
आणि — स्वच्छंद असें मी, माझी चाल अभंग
लहरी — मी फुललों आंतुनि, कुणाचा न अनुयायी

ध्यानस्थ महर्षीपरी बैसुनी येथ
गिरिशृंगांनो ! कां रचितां मानव-सूक्त ?
त्यांच्यास्तव अम्हिहीं कढलों अन् काजळलों
तव स्पर्शें म्हणुनी होतों जीवन-मुक्त

ढाटा १९५ ते २००

पेलून पखाली मेघांच्या दिनरात्रीं
निःशब्द जाहली वर्षा, गळली गात्रीं
पाहून पीक परि मायेच्या मोलाचें
कार्तिकी चांदणें फुललें तिचिया नेत्रीं

गौरवें देउनी आसनास चौरंग
छात्रांनो ! वदलां, "तुम्हि अमुचे श्रीरंग"
कमलजा कला मम नाहुनि त्या निष्ठेंत
होईल शुचिर्भुत, राहिल गात अभंग

पूर्वेच्या द्वारांतुनि पडतां बाहेर
पाहिलें न्याहळुनि आसमंत चौफेर
जग कवळिन सारें सहज वाटलें तेव्हां
आतांच पडे परि संध्येचा अंधार

वस्त्रांची माया नको देह झाकाया
शस्त्रांची माया नको देह जिंकाया
स्वामित्व हवें तुज, तरि तें घे आत्म्याचें
जिंकील भाव-बळ ज्याचें अखिल जगा या

भारल्यावीण घन, धरा न हो समृद्ध
भारल्यावीण मन, वाणि न हो रस-सिद्ध
फुलतात जिथें जन सेवा-स्वार्थत्यागें
आसमंत तेथिल अनुरागें कर-बद्ध

४० : ४१

लाटा
२०१
ते
२०६

संतांच्या वंशावळिशीं जुळवित नातीं
वर्षानुवर्षे ती वळीत होती वाती
वाटलें बोलणें खरें तिच्या भक्तांना
ती जातां स्वर्गीं जन्माष्टमिंच्या रात्रीं

आषाढ उभा शिरिं, मना अतां तरि पेर
लाभेल कार्तिकीं तुला श्रमाचा शेर
पद रुततिल पंकीं चातुर्मास, रुतूं दे
त्यानेंच राहशिल सुखेन वर्षअखेर

ग्रीष्मांत जेधवां कणोकणीं जळतें मी
तूं बिंदुबिंदुतुन कढसी अंतर्यामीं
असहाय तुला मम झाले क्लेश, म्हणून
कां घनश्याम होउनी विचरसी व्योमीं ?

गिरवितां वळण बाल्यांत ' श्रीगणेशा ' चें
कुणि नव्हतें लिहिलें भाकित भवितव्याचें
मज स्मरे एकदां श्री मीं पुसली रागें
ती रुसली, तेव्हांपासुनि जीवन जाचें

खेळलास दैवा अर्ध्यावरती डाव
चल खेळ पुरा, कर पुरी जिवाची हाव
उलटेल डाव कां म्हणुनि दिरंगाई ही ?
कां असह्य झाले पुरुषार्थाचे घाव ?

डोळ्यांनो ! माझीं स्वप्नें जोजविलींत
शब्दांनो ! त्यांचीं हृदयें पालविलींत
अंजलीबद्ध होऊन आणि हस्तांनो !
सद्भावें सिंचुनि रसिक-जनां दिधलींत

अद्वैतसूक्त प्रवचून प्रहरभर त्यानें
उपरणें आपुलें लपेटिलें अभिमानें
“ वेगळे कुणितरी आपण इतरांहून ”
स्मित-मुखें सुचविलें सहज अनुप्रासानें

छाटा २०७ ते २१२

व्यवहारा देतां पूर्णांकांचें रूप
हें सरलें जीवन, सरला आणि हुरूप
बेरजेहून वाढतां वजाबाकी ही
उमजलें मला नच उत्तर हें अनुरूप

ओझ्यानें लवतो ‘ आज ’ कण्यांत जयाचा
त्याचाच ‘ उद्यां ’ घडवितो ताज विजयाचा
विरघळतां सारें स्वत्व कर्मयोगांत
हो जीवन अपुलें विषय विश्व-प्रेयाचा

जिंकून हवें तें अस्मानांतिल स्थान
देतोस पयोदा, दिगंतराला दान
तुज मिळतां उंची गिरिवर ही अनुयायी
विसरले वेदहि न गाया तव गुणगान

भूवरले सरले दैनंदिन संबंध
पापण्यांत भरला उरिंचा भाव-मरंद
पांखरापरि अतां दिगंत भ्रमण जिवाचें
मम सूत्र कुणाच्या हातिं न, मी निर्बंध

कळलें न कधीं मज कशांत धर्म-अधर्म
विसरून मला मी करित राहिलों कर्म
जन-मनीं मंत्र किति घुमला मज ना ठावे
बोलकें माझिया कृतींत जीवित-मर्म

लाटा
२१३
ते
२१८

पापण्यांत आणुनि उत्कट भाव अपूर्त
रात्रभरीं जळलें हृदय तयाचें आर्त
निस्तेज पहांटे होतां ग्रह-नक्षत्रें
क्षितिजावरि दिसलें प्रेय तयास समूर्त

हें जीवन म्हणजे जन्म-मृत्युंतिल रेषा
जीवरी लिहीं मन नित्य नव्या उन्मेषा
त्या रेषेवरलें भाव-नृत्य थयथयतें
आत्म्यास देतसे जगावयाची ईर्षा

जग चाले हें युगचक्रांच्या रेषांत
होऊन धुंद पितरांच्या जय-घोषांत
पथ रूढ न माझा, रत मी ब्रह्मानंदीं
उकलितों गूढ प्रतिभेच्या उन्मेषांत

डिवचुनी कधीं मन सांगे जन-संमर्दीं
तूं नकोस रंगूं इथें कुणाच्या नादीं
पालटेल पाण्यापरि तव येथें रंग
निस्संग रहा तूं दंग आपुल्या छंदीं

धूळिनें जगाच्या मळुं दे माझी काया
दलितांच्या दैन्यें वितळो माझी माया
ते स्नेहकिरण अन् हृदिंचा तो ओलावा
येतील अखेरिल निर्माल्या कवळाया

तुजसवें चितारित हृद्रागांचीं वलयें
वय अर्धतपाचें सरलें आज, रुबाये !
सहचरी परी जरि विश्वसाशिल अशि कंठीं
व्यक्तवीन याहुनि ललितोत्तम मी प्रेयें

ये कधिंहि कसाही मृत्यो मज ग्रासाया
मी विटलों इहलोकींच्या सहवासा या-
खल तुझ्याहुनि किती निर्घृण मजपुढती हे
बिलगली जयांची घटसर्पांपरि माया

लाटा
२१९
ते
२२४

भिरभिरुनि गुंगुनी अवघ्या ब्रह्माण्डांत
कधिं प्रतिभा होई श्रमभारें विक्रांत
मग जागृतींतुनी सुषुप्तींत मन रंगे
अन् अनुभूतीची कांति चढे नयनांत

हें जीवन व्यापी माझें औदासिन्य
फुंकरी खुळ्यापरि दृष्टिसमोरील शून्य
वाटलें तयाला घटका भवितव्याच्या
पाहतील यांतुनि जीवन-स्वप्न अनन्य

उदधिचें उकळतें जीवन घेउनि पोटीं
सांगती जलद हें औदार्याच्या गोष्टी
तुम्हिं-अम्हीं त्यापरी ऋषिवर्यांच्या सूक्तें
जग नाचवितों हें, रंगवून रसवंती

नच अपुल्या हातीं जन्म-मृत्युची बाब
कां व्यर्थ चिंतनें मनावरी द्या दाब
आनंद लुटा तर मग जीवन-कक्षेंत
स्वच्छंदीं रमणें हितकर हीच शराब

पेलून दिवसभर शिरिं रखरखतें उन्ह
आतपें जातसें जीवन मम करपून
तरि नक्षत्रापरि सायंतनिं मनिं माझ्या
उतरती कुठुन तरि भाव अनंतांतून

लाटा
२२५
ते
२३०

धांवत्या जगांतिल दृश्यें लालित्याचीं
मनिं सांठवणें अन् आठवणें नित्याचीं
आजन्म जागलें जरि हें जीवित-प्रेय
यांतुनीच निर्मिन लेणीं साहित्याचीं

बरसून रात्रभर थकलेली पागोळी
वळचणीस होती गुंगत अस्फुट ओळी
उघडिलें दार, पाहिलें, तिथें नव्हती ती
परि धुळींत दिसली चित्रित मज रांगोळी

नवक्षितिजें धुंडिति डोळे तव स्वप्नाळू
सेवामय कर तव बघति जगा कवटाळूं
बद्धास कराया मुक्त तुझें मन जागें
शब्दांस्तव तुझिया काय काय समतोलूं ?

वैशाखें केली प्रिया-धरेची दैना
देवेन्द्र धुंडितो म्हणुनि चहुंकडे वरुणा
भावार्त सख्याची येउनि मग अनुकंपा
तो वरुण निघे घेऊन घनांची सेना

वैशाख म्हणाला, " उरिंची माझ्या आग
मानसिंचे जाळिल शीतल कमल-पराग "
परि विरले त्याचे अहंपणाचे बोल
गिरि-शिखरावरती बघुनी वळला मेघ

लाटा
आणि
लहरी

तुम्हि चितारिलीं डोळयांत आणुनी आंसूं
तीं वलयें मजभंवतिचीं नका विध्वंसूं
त्यांच्याचमुळें आत्म्यांत वेगळी शक्ति
तेजांत तयांच्या वृत्ती ध्येयपिपासू

पद पुढें पडे तरि, प्रगती काय म्हणूं ती ?
पथ उजळिल कां स्नेहाविण जळती पणती ?]
दशदिशा हरपल्या अवसेच्या तिमिरांत
तरि दर्शवील पथ अंतर्लोचन-दीप्ति

लाटा २३१ ते २३६

सामर्थ्य विरो मम आत्म्यामाधिं गात्रांचें
नव-किरण विरो मम नयनीं नक्षत्रांचें
विसरून इथें मन, मी पद्मासनबद्ध
श्वासावर चढुं दे वैभव गण-मात्रांचे

लाभलें ऋषींचें अखंड जीवन-दान
हें चढलें म्हणुनी अनंतांत अस्मान
हृद्‌भाव तयांचे ग्रह-गोलांच्या रूपें
मनुजाचें झालें अक्षय चिंतन-स्थान

गायिली तयानें ज्योत्स्नेची शीतलता
कामिनिचें यौवन, वारुणिची मादकता
अनुभूति-शून्य तीं कवनें परिसुनि त्याचीं
कुणि वदलें, " याहुनि अधिक बरी नीरवता "

करिं जरी सुकाणू होतें, तरिहि धुक्यांत
मज कळलें उशिरा चुकली अपुली वाट
उभविलें शीड तरि गांठायास किनारा
घेईल घेउं दे, कुशींत चढती लाट

उजळून निमिषभर भंवतींचा अंधार
जाहली जगाच्या विद्युत् नजरेपार
निखळून पड व्यक्तित्व क्रोध कडकडतां
सौजन्यें अच्युत तारांचा संभार

स्फूर्तीस नको मम, भाटांचा हुंकार
तालास नको मम, लक्ष्मीचा झंकार
नाचेन नाचविन जग मी ब्रह्मानंदें
शब्दांत जेधवां होइल मन साकार

लाटा
२३७
ते
२४२

शब्दावर ज्याच्या सरला सागर मागें
व्यक्तित्व तयाचें शिल्पांतुनि ह्या जागें
परि विश्रांतीस्तव बसतां त्याच्या शीर्षी
' काव, काव ' करिती काक, मनाला लागे

जागवीन म्हणतो असेंच जीवित शेष
ओसरले अजुनि न अंतरिंचे उन्मेष
जागशील जरि तूं मजसह गात अशीच
मृत्युंजय होतिल कविते ! भाव - विशेष

बोलती संत तूं जळीं स्थळीं पाषाणीं
तत्त्वज्ञ सांगती तूं तर अंतःकरणीं
साशंक परी मी तव अस्तित्वाविषयीं
असशील अनंता, तरी गूढ अस्मानीं

घोषितां जगाला ' सत्य - अहिंसा - धर्म '
उलटली तयाची साठी, करितां कर्म
प्रवचनें थांबलीं त्याची भूतदयेचीं
लाखानें मिळतां सत्कारार्थ छदाम

लाटा
आणि
लहरी

ऋतुराज सहाही येउनि नवरसरंगा
हे गंधवती तुजभंवति घालिती पिंगा
लालित्यें नटसी परि वर्षाऋतुसंगें
जो स्कंधिं तुझ्यास्तव वाहतसे स्वर्गंगा

बांधुनी तयाची होतां तुंग हवेली
वाटलें तया नभ नमलें आलें खालीं
जाहला एकदां अनपेक्षित भूकंप
चिरडला चिरंतन अहंकार पाताळीं

संबोधी तुज जग ' शब्दसृष्टिचा ईश '
तरि कवनांतुनि तव ओतित ये अवशेष
लागल समाधी जेव्हां निर्मात्याची
शब्दांत उतरतिल तेव्हां भाव - विशेष

फेकुनी धरेवर अखेरचा दृक्क्षेप
घेतली रवीनें पाताळामधिं झेप
जो उजळी तेजें वलयें ब्रह्माण्डाचीं
मोहांत न गुंते, कर त्याचे निर्लेप

उतरतां नभांतुनि घनमाला चुंबाया
गिरि - शिखरें स्त्रवलीं झरलीं सरितांतुनि य.
आसमंत भरतां त्यांच्या जीवनतेजें
लागली धरेची आशा आर्त फुलाया

सन्ध्येस लागतां स्वर्भूदारीं ज्योती
शिण कर्तव्याचा तरळत जाइ दिगंतीं
कणकणांत मनिंच्या भरुनि उरें चैतन्य
उर स्फुरे कवळण्या अज्ञेयांतिल मुक्ति

शब्दांनो ! माझ्या भाव गुंतवुनि चरणीं
प्रेयसिच्या अविरत जागवितां आठवणी
मरणोत्तर माझ्या परि ते तुमचे छंद
ती रंगवील कां अंतरिंच्या अश्रूंनीं ?

ळाटा
२४३
ते
२४८

४८ : ४९

चिंतेंत अहर्निश काजळली ही काया
तरि लागे हृदयीं नव-चैतन्य फुलाया
लाटा तडितेसम भेदुनि श्रावण-घन अंधार
२४९ पिंडांतिल अणु मम उजळिल ब्रह्मांडा या

ते

२५४ आवरितो जेव्हां रवी किरण-संभार
करि सन्ध्या थकल्या मनिंचा श्रमपरिहार
तिमिरांकित होतां धरा निशा-पटलानें
मम जीवन-स्वप्नें जागवितो अंधार

चिंतनें विसावे बधीरता गात्रांत
भावना उरींची थयथयते नेत्रांत
जाणीव विसरते दिक्कालांचे बंध
अवतरतें जीवन सहज छंद-शास्त्रांत

काळानें नांगरिलें हें जीवन-शेत
ऋतुमान पाहुनी ज्यांत पेरिले बेत
अतिवृष्टि त्यांत परि झाली दुर्दैवाची
हातीं न श्रेय ये, म्हणुनी मी अनिकेत

गांठिली रवीनें माध्यान्हींची कक्षा
करभार तयाचा करिल धरेची रक्षा
तुज म्हणति पयोदा सहृदय, अचल कसा तूं ?
कां स्वप्नरंजनीं विस्मरसी तव दीक्षा ?

गगनाला भिडले तुंग इथें प्रासाद
लाटा येथें न कानिं ये नाण्यावांचुनि नाद
आणि परि पिळुनि आंतडें दिवसभरी जळती जे
लहरी मृत्यूच तयांच्या हांकेला दे साद

कधिं अंकुरतां मनिं नव-कवितेचें बीज
आंतून कडाडे सौ., " ही आणा चीज "
तंद्रींतच त्या मम चरण जुळे ओठांत
" भूगर्भ जाळिते उल्का होउनि वीज "

लाटा
२५५
ते
२६०

खिडकींत राहुनी उभा घराच्या माझ्या
वर्षानुवर्ष पाहिली जगाची ये-जा
साकारित स्वप्नें भ्रमती मानव सारे
खेळती तयांच्या हृदयीं भाव झपूर्झा

अस्मानीं चढतां प्रतिभेची मम झेप
नभ निळें उतरतें नयनीं आपोआप
शृंखला निखळतां पदिंच्या भूलोकींच्या
मुक्तींत रंगलें मन घे नव आलाप

मन गोंधळलेलें विश्वाच्या व्यवहारीं
थांबतां तयाची ये-जा, ये माघारीं
कुठलीहि कहाणी सांगे मज खुलवून
अश्रूंत रुधिरिं वा जरी रंगली स्वारी

जाणुनि न आत्मबल तुझें तेधवां येशू !
सारेच धांवले घेउनि हातीं परशू
आत्म्यांत तुझ्या परि जिवा-शिवाची भेट
हें कळतां गळलें, नयनांतुनि त्या आंसूं

न्याहळितां त्यानें गुहेगुहेंतिल शिल्प
त्या कळलें अपुलें ज्ञान किती अत्यल्प
बोलला, " अहो ! ही संयमिनींची सेवा
शतकांच्या त्यागांतून फुले संकल्प "

कधिं अंकुरतां मनिं नव-कवितेचें बीज
आंतून कडाडे सौ., " ही आणा चीज "
तंद्रींतच त्या मम चरण जुळे ओठांत
" भूगर्भ जाळिते उल्का होउनि वीज "

खिडकींत राहुनी उभा घराच्या माझ्या
वर्षानुवर्ष पाहिली जगाची ये-जा
साकारित स्वप्नें भ्रमती मानव सारे
खेळती तयांच्या हृदयीं भाव झपूर्झा

अस्मानीं चढतां प्रतिभेची मम झेप
नभ निळें उतरतें नयनीं आपोआप
शृंखला निखळतां पदिंच्या भूलोकींच्या
मुक्तींत रंगलें मन घे नव आलाप

मन गोंधळलेलें विश्वाच्या व्यवहारीं
थांबतां तयाची ये-जा, ये माघारीं
कुठलीहि कहाणी सांगे मज खुलवून
अश्रूंत रुधिरिं वा जरी रंगली स्वारी

जाणुनि न आत्मबल तुझें तेधवां येशू !
सारेच धांवले घेउनि हातीं परशू
आत्म्यांत तुझ्या परि जिवा-शिवाची भेट
हें कळतां गळलें, नयनांतुनि त्या आंसूं

न्याहळितां त्यानें गुहेगुहेंतिल शिल्प
त्या कळलें अपुलें ज्ञान किती अत्यल्प
बोलला, " अहो ! ही संयमिनींची सेवा
शतकांच्या त्यागांतून फुले संकल्प "

ळाटा
२५५
ते
२६०

५० : ५१

लाटा
२६१
ते
२६६

करि पदक्षेप तव जीवन नव-वर्षांत
कां उदासीनता ? नाच मना हर्षांत !
प्राशून जहर जरि असेल जळला कंठ
हा फुलो सुहृद्गण फिरुनि भाव-स्पर्शांत

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १०५७३
शाखा स्थळ प्र

उकलिलीं प्रमेयें अनंत यंत्र-युगानें
काळाच्या तालावरलें झालें जगणें
अद्वैतभाव करपतो परी जो त्यांत
तो उमले केवळ संतांच्या आचरणें

गुंगींत बघुनि मज गुणगुणतांना काव्य
गणगोत म्हणे हा " विसरला कर्तव्य "
कर्तव्य तयांचें कांता-धन-घरदार
मम काव्य पिढ्यांचें साकारिल भवितव्य

स्वप्नांची दौलत उरिं लपवून पहांटे
मी मुलुखगिरीस्तव निघतों रविच्या वाटें
कधिं स्वेदें भिजतां भाल घोडदौडीनें
जन्माची वैरिण उदासीनता भेटे

" हृदयांत माझिया स्वर्गाचें प्रतिबिंब "
दर्पांत म्हणाला तारकेस दंव-थेंब
ती वदली, सोडुनि जातां गगन-महाला
" उदयाचलिं येइल, थांब जरा, रविबिंब "

ओतीत जांभुळी पेय निळ्या चषकांत
रंगलें रसिक ते नृत्य-गीत-जलशांत
पथिं गात विव्हळत होति भिकारिण कोणी
तांबूलें रंगे पदर तिचा तिमिरांत

लाटा
आणि
लहरी

भूलोक शोकमय दिसतो हा सर्वत्र
आलोचन चिंतन म्हणून करिते रात्र
सुविचार विखुरले तिचे निळ्या फलकीं या
संबोधी जग त्या ग्रह - तारा - नक्षत्र

क्षण टिपुनि घेतले जे जे अनुभूतीनें
घडविलेंस त्यांचें तूंच रुबायें ! लेणें
जाईल नवेपण घाटांतिल कालांतीं
उतरेल तेंच तें परी कसाला सोनें

* * *

ळाटा २६७ ते २६८

५२ : ५३

लहरी
१
ते
२

झालास साउलीपरी पदीं मम लीन
डोळ्यांतिल तुझिया विरले भाव मलीन
नेणतांच नमलें मीही, तों तव स्पर्शे
मज जाणवलें तूं ईश्वर, मी अकुलीन

चाळितां सहज मी तुझ्या स्मृतीचीं पानें
तीं दिसलीं अंकित अमर-प्रीति-सूक्तानें
अपुरेंच त्यांत मज सूक्त एक आढळलें
मज कळलें, गुंफाया तें ये न कशानें ?

तुज जडली राया निळ्या जगाची माया
स्पर्शाविण तुझिया काजळली ही काया
कंठांत न आतां उतरे हिरवा घांस
प्रतिबिंबे नयनी तुझीच अक्षय छाया

जाणलें क्षणिंच, तें जाणवलें जन्माचें
बांधिलें म्हणुनि हें पैंजण पदिं छंदांचें
कधिं दिवस दिवस लय लागे ब्रह्मानंदीं
कंठितो तेधवां जीवन निर्बंधांचें

प्रतिबिंब पहाया परसांतिल विहिरींत
कुंपणावरुनि हा लवे तुझा प्राजक्त
एकलीच केव्हां जलभरणा जातां मी
हिंदळती उरिंचे मनोभाव अव्यक्त

" येथें न प्रिये कुणि, आतां बोल हवें तें "
" शब्दांत गुंफिता ये न रेशमी नातें "
" भूवलयिं तुझ्या मम गुंतुनि राहे भाव "
" तो येइल स्पर्शें सहजचि उकलायातें "

वादळतां माझीं जीवन-क्षितिजें सारीं
तव स्वप्नच्छाया दिसे निबिड-अंधारीं
मज स्मरती, देती स्फुरण तुझे मग बोल
" तूं गरुड, घ्यायची तुज अस्मान भरारी

तुजसाठीं केलें उरिंचें कलश रिते मी
अन् अतां आकिंचन जळते अंतर्यामीं
चंडोल नभांतिल तूं, तव स्वर-वलयांत
विरलास, आणि मी विरते माझ्या धामीं

लहरीं
३
ते
८

क्रमांक ....१४४३.... नों: दि: ७६-११



हें बघुनि नितंबिनि तुझें बदामी भाल
त्यावरिल आडवे आणि कुंकु रवाळ
  न कळतां उतरली नजर तुझ्या डोळ्यांत
गुंततां तिथें ती, अडखळली पदचाल

कंचुकिचा माझ्या असें कुणाला छंद
जाणिते माळ ही, म्हणुनि रुळे स्वच्छंद
  सखि-हृदय फुलापरि लागे कुरवाळाया
दरवळतो ज्यांच्या दलांत भाव-सुगंध

येतोस तेधवां पायगती बससी तूं
संकोचुनि अपुलें पांघरुणापरि हेतू
  ध्वन्यर्थं मनींचा नयनिं तुझ्या आंदोले
एकरूप होतो ज्यांत घडीभर मी-तूं

कधिं शेज फुलांची तुला न मी अंथरिली
नच वक्षस्पर्शें काया तव मंतरली
  देईल हवी तर परि हा साक्ष गवाक्ष
भावना तुझ्यास्तव कितीकदां गहिंवरली

म्हणतोस, " चिंतनीं तुझिया मम उत्कर्ष
काळाचे क्लेशहि विसरवितो, तव स्पर्श "
  " माझ्यांत न न्यारें, तुझाच भाव-विलास
आचरितो उत्कट प्रीतीचा आदर्श "

पद वळे, अंजली जुळे तुला पाहून
भाव मुग्ध होई मन आहे त्याहून
  परततां, नाहुनी तव रसना-धारांत,
हें जीवन, वाटें घ्यावें तुज वाहून

कां न कळे होई हरीस आज विलंब
काजळे सृष्टिचें यमुनेंतिल प्रतिबिंब
बधिरलें गात्र अन् गात्र करून प्रतीक्षा
घट झरला कटिंचा, भिजून जाइ नितंब

तुज दिलें वाटतें तुला हवें होतें जें
करुं काय ? जरी तुज झालें त्याचें ओझें
वाकलास पुरता तूं त्या ओझ्याखालीं
तुजकडे पहाया परि न धजे मन माझें

वर्षेचे मर्दुनि पयोद चातुर्मास
उत्कंठित उरिंचा गिरिवर शमवी प्यास
ओहळे झऱ्यांतुनि तृप्ति रुपेरी त्याची
उधळीत तुषारांतून तरंगोल्हास

कालवून जन-स्नेहांत मनाची माती
घडविली हवि तशी सेवेची मी पणती
ठेवलीस अक्षय प्रज्वलीत तूं तीस
जागरूक राहुनि, वळित दिलाच्या वाती

" करकचून बसले कंचुकिचे हे कांठ
ये प्रियंवदे ! तूं उकल मारिली गांठ "
" हा दोष न माझा, तुझाच गे मुनिकन्ये !
तव जीवन व्यापी क्षणक्षणा नव प्रांत "

मल्हार गायिला कधींच घनमालेनीं
स्वर्गीय पिसारा आवरिला मयुरांनीं
इंद्रधनू भंगे क्षितिजाच्या स्कंधींचें
अन् काजळलें मन्मन संध्या-छायांनीं

लहरीं
१५
ते
२०

करिं घेतां झरणी धरिति तुझ्या स्मृति फेर
एखादी त्यांतुनि घेई मधुनि लकेर
बेचैन करी स्वर तिचा अहर्निश केव्हां
नाचतो शब्द-ब्रह्मांत मीहि मग स्वैर

लहरीं २१ ते २६

जें दिलें जाणुनी तेंच देत राहीन
ये कधिंहि, कसाही होऊं नको परि लीन
हा रंक, राव हा, द्वैत न प्रीतीपाशीं
मी गुणलुब्धा, तुज कधिंहि न अव्हेरीन

कालच्याहून मी नसे वेगळी आज
वर्षानुवर्ष मम असाच आहे साज
मी तुलाच वाटे इतरांहून निराळी
यमुनेंत प्रीतिच्या तुझ्या नाहतो ताज

'स्नेहांकित मी तव,' असेल तुज अभिमान
परि स्नेह तुझा मम एकमेव वरदान
होतसे गंधवति धरा मेघ–वर्षावें
तरि तिच्या जलाशयिं प्रतिबिंबे अस्मान

मुद्रिकेंत तुझिया पाहियलें मम नाम
जीवनीं नकोशा क्षणभर दिसला राम
असतील अक्षरें तींच जरी हृदयांत
समजेन जिवाचें अक्षर तेंच इनाम

लिहिलीं जीं तुझिया प्रीतीच्या झरणीनीं
तेवढींच माझीं आवडतीं गे गाणीं
ध्वन्यर्थ कळो वा कुणा कळो न तयांचा
ती स्फुरली अपुल्या जीवन-अनुभूतींनीं

जरि निसर्ग फुलवी नकळत तुजसी, मुग्धे !
पूर्णत्व यौवना परि ये प्रीति-सुगंधें
   स्पर्शील तुला जो जाणुनि हृत्-सौंदर्य
आणील तुझ्यास्तव स्वर्ग तोच अनुराधे ।

यायचें मरण जरि असेल मज एकाकी
येउं दे, रुबाया स्फुरतां तुझिया अंकीं
   ओतीन प्रीतिचें मद्य आपुल्या तींत
प्राशितां स्मरण मम होइल घटको-घटकीं

दहिंवरला सारा परिसर शीतलतेनें
मी उभी गवाक्षी थरथरत्या अधरानें
   साथीस्तव बघती वाट हृदयिंचे बोल
एकलें खुलें नच हेमंताचें गाणें

आलास आजवर व्यसनांतुनि ताराया
ये आज तसाही दारीं भाऊराया
   लावूं दे बिजेची तुझिया भालीं कोर
पथ तिमिरांतिल हा घटकाभर उजळाया

स्मृति-वलयीं तुझिया रमतां मन अनुरागें
एकाग्र होउनी अवकाशांत तरंगे
   न्याहळितों तेथुनि विश्वाचे व्यापार
उकलितो आणखी भवितव्याचे धागे

यश संग्रामांतिल तोलुनि आजवरींचें
झुंजारहि वदले, “ याचे कर सूर्याचे ”
   हिरकणी प्रीतिची धरितां मजपुढती तूं
“ हृद्राग तयाचे, ” वदले, “ इंद्र-धनूचे ! ”

लहरीं २७ ते ३२

५८ : ५९

लहरीं
३७
ते
३८

आषाढ घनांच्या सहवासें घटकेच्या
नवबीज राहिलें उदरीं गंधवतीच्या
लालनें वाढतां पुढलें चातुर्मास
कार्तिकीं चांदणें फुललें वदनिं तियेच्या

घेऊन आपुल्या शशिबाळास कुशींत
त्या पाजित होती रजनीदेवि निशेंत
उचलितां सुख तयें, मुक्त उरोजावरुनी
चांदणें, नव्हे पय, ओघळलें लज्जेंत

घनघोर युद्ध संपलें, परतले स्वार
साम्राज्य स्थापिलें विजयें अटकेपार
सिंहासन खचलें लुटल्या रत्न-हिऱ्यांनीं
नवतींत नाहली विरही पुतळी नार

वाहनीं तिनें कुणि बाला बघुनि स्वरूपा
उचलुनी हनुवटी तिचा घेतला पापा
मागेच बैसल्या बालेच्या तातास
ये कृष्णेची ही तृषा बघुनि अनुकंपा

एकांतीं हृदयीं घुसतें जें जें गाणें
येतात प्रीतिचें अपुल्या त्यांत उखाणे
जीवनिंच्या उत्कट संयोगित भावांचे
होईल कुणातरि रसवंतीचें लेणें

कचपाश मोकळा वाळवितां रवि-किरणीं
उरिं स्फुरती, विरती कंचुकींत आठवणी
होतेच जायचें, तरि तें आज कशाला ?
हृदयींचें कढले शमती भाव मुक्यानीं

लाटा
आणि
लहरी

लहरी ३९ ते ४४

विरहि ती रात्रभर पूजित होती नाथ
जागवीत अपुल्यां जीवनिंचा एकांत
स्मृति विरल्या मनिंच्या मावळतां निशिनाथ
अन् कर्तव्याच्या दडली प्रीति कुशींत

अंकुरली अपुली बीजावांचुनि प्रीति
मोहरली तिजवरि आज परी आसक्ति
मन सुटुनी संयम, स्फुरे संगमा केव्हां
वरि प्रतीक्षेंतल्या निमिषांतील अशांती

हितगूज आपुलें विरघळतां ज्योत्स्नेंत
करपार्शी स्फुरलें आवरिलें उरिं हेत
सामर्थ्य पेलितां वक्षीं सौंदर्यानें
शिथिलतेंत विरली आसक्ती घटकेंत

मज बघुनि चांदणें फुलें तुझ्या नयनांत
हितगुज येउनी आणि लपें ओठांत
प्रस्फुरती जिवणी सांगे ध्वन्यर्थानें
" ही कटि-बन्धाची उकल अतां निरगांठ "

वाक्स्पर्शें तव उलगडे मनाचा पीळ
निखळली अधरिंची संकोचाची खीळ
शब्दांच्या नादें मोहरले हृद्भाव
तुज आलिंगाया हृदय तुटे तिळतीळ

सौख्यानें सलतें, फुलतें अन् दुःखानें
मन माझें, आतां एकच त्याचें गाणें
चरणांत तयाच्या विरघळला हृद्भाव
रुचि कुणि न तयाची अनुभूतीविण जाणे

लहरीं
४५
ते
५०

भुजबन्ध तुझा दे पुरुषार्थाची ग्वाही
मोहरली गात्रागात्रांतून तनू ही
निमिषांत उमलते अवघडली संकोचें
अंगार-स्पर्शें कणाकणांतुनि लाही

आरक्त त्वचेची सौष्ठवयुत काया ही
धर्मार्थकाम परिपूर्तीची दे ग्वाही
हें रविवर्म्याच्या चित्रांतिल सौंदर्य
अजुनिही माझिया मनास सौख्यद होई

रेशमी प्रीतिचा पीळ असा जळतांना
दाहकता त्याची साहवे न नयनांना
अवशेष म्हणुनि मी माझ्या दग्ध मनाचे
नभिं बघतो विरत्या अतां धूम्र-वलयांना

मी करितां मानस-सरसीं चिंतन-स्नान
तूं अधर तटावरि गासीं पंकज-गान
त्या आलापें मनिं उठती भाव-तरंग
वलयांत त्याच मी विसरे जीवन-भान

जाणून घ्यावया माझा जीवित-हेतू
लटिकेंच बोलसी, "कां रे छळसि असा तूं?"
"परि तरुनी जाया सागर वांछितसे जो
कां तरेल बांधुनि शैवालाचा सेतु?"

सहवासा अपुल्या कॆवि म्हणावें प्रीत?
प्रीतींत घुमे दो हृदयांचें संगीत
मी उदास होतों असतां तूं हर्षांत
मम उत्कर्षीं तूं विरसी, हें विपरीत

तूं हंससी फुलसी विमल मानसीं बाले !
सांगसी सख्यांना " चांदण्यांत मन न्हालें "
सर्वस्व आपुलें वाहुनि तुज सुखवी जो
तो चंद्र, जाणसि न, क्षयें कितिकदां पोळे

कवळिलें न त्याचा केंवि जडावा नाद ?
भोगिलें न त्याचा केंवि चढावा माद ?
नच हंसला फुलला जिथें कधींहि वसंत
देतील तिथें नच कोकिल-बुल्बुल साद

कधिं काहुर मनिचें काजळवी भंवताल
घटकांतुनि नकळत विरघळतो अन् काळ
परि खिळतां नभिंच्या नक्षत्रांवर दृष्टि
काळाहुनि वाटे अपुली प्रीति विशाल

कचपाश सैलसा मानेवरती रुळतां
अन् पदर उरोजावरुनि जरासा ढळतां
लय तुझ्या चालिची नितंबिनी त्यांतून
काजळवी नकळत मनिंची ज्योतिर्मयता

बाहेर सारखी ठिबके श्रावणधार
कोनांत आणि ही पडुनी राहि सतार
दर्शनावांचुनी केंवि तुझ्या दिल्दारा
गवसणी काढुनी छेडुं हवे ते सूर

पूर्वेच्या वक्षीं टेकुनि अपुला माथा
निशिनाथ प्रीतिची गाउं लागला गाथा
दोघेही आपण त्या अमृत-लहरींत
विसरलों रात्रभर जीवनिंची ऐहिकता

लहरी
५१
ते
५६

लहरीं
५७
ते
६२

संकोच नको, ये, उतर पयोदा खालीं
अभिषेक कराया यक्षिणिच्या या भालीं
भारल्या हृदयिंच्या तुझ्या बिंदुबिंदूंत
विरहार्त सख्याची उत्कटता अवतरली

तव स्मृतींत न्हाते, तेव्हां मन हें गातें
गुंफीत आपुलें नव छंदांतुनि नातें
उलगडुनी पाही पीळ कुणी धाग्यांचा
अन् म्हणे, " वीण ही येते क्लेश जयातें "

लौकीक बन्धनें प्रीति कधीं न जुमानी
नित संचरते जी स्वप्न-पुष्पकीं गगनीं
" हें तुझें आणि हें माझें " विरतें जेथें
प्रस्फुरती तेथें अद्वैताचीं गाणीं

कांतींत प्रियतमे तुझिया उतरे आतां
आषाढ-घनांच्या छायेची श्यामलता
पापण्यांत तरला हृदयीं रुतला भाव
चल अमर होउं दे संध्येची नीरवता

मार्तंडतपें जें सुकलें गळलें फूल
मातींत तयाचा मिळतो देह मलूल
प्रीतिपुष्प अपुलें जळलें जरि विरहानें
तरि अंतर्दृष्टिस पडेल त्याची भूल

वाटते कुणाही लेउनि ये नवप्रीति
आषाढ-घनांच्या इंद्रधनूची कांति
गिरिशृंगाघातें परि जीवन-कल्लोळ
अडखळतां, विरतां, विरते धनु शून्यांतीं

श्वासासह शोषुनि तुझाच कीर्ति-सुगंध
जगविलें कसेंतरि जीवन हें स्वच्छंद
  कक्षेंतुनि माझ्या दूर...दू...र जातां तूं लहरी
संयमी मनाचे तुटले सुटले बन्ध ६७
ते
विरहांत तुझ्या मन होई दर्शन-वेडें ६८
सन्निधीं तुझ्या तें मीलनास परि ओढें
  बेहोष जिवाची उत्कट प्रीति-पिपासा
जाळील कळे जरि उत्कर्षाचे वाडे

मी जळते याचा तिळहि न क्लेश जिवास
जळण्यांत माझिया तुझा परंतु विनाश
  तिमिरांकित देव्हाऱ्यांतिल ज्योतीसंगें
काजळून जावी कां नभिंची आरास ?

भंवताली ओतित खदिरांगारी आग
तडितेसम समरीं लवलें त्याचें खड्‌ग
  उतरतां साज शिरिं, येतां रंगमहालीं
तो ढळला पाहुनि कामिनिचा भ्रूभंग

काळाच्या सरतां घटका रात्र सरेल
चिंतेंत भारल्या नेत्रीं नीज भरेल
  ज्योत्स्नेंत नाहतें रूप तुझें हिमगौरी !
मम अपूर्त जीवित-आशा-स्वप्नि तरेल

घे अशीच झांकुनि हिरव्या पदराखालीं
मम रात रंगु दे उरिंच्या रंग-महाली
  आकंठ इथें घट इष्काचे भरलेले
साकी नि मद्यपी–अपुली नाति निराळी ६४ : ६५

लहरी
६९
ते
७४

बाल्यासह सरलें अंतरिंचें चांचल्य
वाढल्या उरींचें मानस-सरस सखोल
आकळें न मधुपा तरल्या कमळावरल्या
किति रुतलें मुग्धे, खोल तयाचें मूळ ?

घटकाभर ओती तेज विजेची कोर
तरि जगे त्यावरी दिनभर आर्त चकोर
तव अधरीं स्रवले प्राशुनि कधिं मधु-बिंदू
दिन-मास विसरतो हृदयीं जडला घोर

होणार जिवाचा विनाश आसक्तींत
मन वेडें तरिही सोडि न अपुला हेत
निमिषांत ज्योत ही करिल जिवाची रक्षा
जाणूनिहि ओढी पतंग अपुला अंत

गाऊन आपुलें करुण-भाव-युत गान
ठेविलीस स्कंधीं विश्वासास्तव मान
आश्वासन देतां तुला मूक हुंकारे
वदलीस, " लाभलें आज खरें वर-दान "

उध्वस्त गडाच्या पडक्या बुरुजावरुनी
गायिलें कितीदां भग्न मनोरथ गानीं
परिसतां आज तें येथें कोकिल-कंठीं
चैतन्य खेळतें गात्रागात्रांमधुनी

आलीस फिराया सहज किनाऱ्यावरती
अन् नकळत आली हृदया माझ्या भरती
चंद्रिके ! परंतू अक्षय ना तव प्रीत
" ये भरतीमागुनि सुकती, " सांगे नियती

लाटा
आणि
लहरी

उड्डाण येथुनी चल घे मानस-हंसा !
दूराविल तुझिया ध्येया प्रीति-पिपासा
    उल्लंघुनि येतां धवलगिरीचें सानू
यश तुझें भूषविल येथिल कमल-निवासा

ओलांडुनि जातां ध्येय पथांतिल आग
उसळले कितीदां तींतुन अग्नि-पराग
    हुंकार कुणितरी दिधला घन-तिमिरांत
“ घटकाभर आणिक मुशाहिरा चल जाग ”

साक्षीस ठेवुनी वेदामधलें सूत्र
आणिती उपाध्ये देह दोन एकत्र
    लौकिकें जाहलें सखया जरि दुसऱ्यांची
मम कंठिं मुकुंदा तुझेंच मंगल-सूत्र

आळवून माझें भावगीत नवरागीं
ठेविलेंस मज तूं डोलत स्वप्न-तरंगीं
    शून्यांत मिसळतां नाद नभोवाणीचे
जाहली फिरुनि मम जागी वृत्ति विरागी

मी असतां तेव्हां प्रणय-गुंजनीं दंग
वाटलें, “ आपुली राहिल प्रीति अभंग ”
    करिं घेउनि आतां शकलें आदर्शाचीं
वेड्यापरि बघतों त्यांत तुझें भ्रूभंग

प्रीतिला आपुल्या नच कसलेंही बन्ध
लालित्य असावें जीवनांत निर्बन्ध
    होतांत सुशोभित सुमनें जरि फुलदाणी
कक्षेंतच त्यांचा दरवळतो सौगंध

लहरीं
७५
ते
८०

६६ : ६७

लहरीं ८१ ते ८६

घटकाभर बोलुनि खुल्या दिलानें जातां
तूं सुचविलेंस मज, " जाते हं मी आतां "
अधरींच राहिले शब्द परंतू माझे
सौंदर्यशालिनी ! चरण तुझे न्याहाळितां

जीवीत-रथाचें करितां तूं सारथ्य
ये पदोपदीं प्रत्यया तुझें सामर्थ्य
अस्तित्व जरी हें राहिल चिर-संग्रामीं
होईल शौर्यमय जीवन माझें सार्थ

वात्सल्य वीर शृंगार करुण तव हृदयीं
स्थल-काल परत्वें स्वच्छंदानें वाही
म्हणुनीच गमे, जग ' रमणी ' तुज संबोधीं
जी रमवि आपुल्या लालित्यें वसुधा ही

गुंफितां आपुली कवनीं अनुपम प्रीति
लाभली जिवाला अननुभूत सुखशांती
परिमलें परंतू स्मृति-सुमनांची माला
करितसे जिवाचा दाह आज एकांतीं

रसरसलें यौवन ओथंबुनि हें सारें
लावण्य-लते ! तूं लवसी कुच-फलभारें
जरि लपसी आवरणांत पुष्प-पर्णांच्या
कुणि विहंग आतां जाइल कां परभारें ?

सेवून सुधा तव स्वप्नमयी निशिनाथा
राहिलों रात्रभर लिहित प्रीतिची गाथा
तूं जातां अलिखित चरण राहिले कांहीं
हो असाच स्फूर्तिप्रद तूं प्रतिभावंता

लहरीं ८७ ते ९२

धुंदीत निशेची शरदृतूंतिल पुलिनें
एकांत फुलविला घटका घटका त्यानें
मार्गशीर्ष येतां झंकारित सौभाग्य
त्या गमे शून्य हें ' सह 'वासविण जगणें

जा ! गाउं नको तव गीत इथें चंदेरी
मत्प्रीत जगाहुनि कां तुज वाटे प्यारी ?
पीयूष-कलश हे अमोल ओतुनि येथें
मजसाठीं सखया होउं नकोस भिकारी

बोललों बोल जे तुजशीं चारजणांत
पडसाद तयाचे विरले अवकाशांत
अव्यक्त परंतू राहियलें हृदयीं जें
गुपित तें चोरुनी ऐकितसे एकांत

जाणतें पुरें जग, तुझें नि माझें नातें
" मी कलावंत, सौंदर्यवती तूं " हें तें
रंगल्या दशदिशा अपुल्या कीर्ति-परागें
स्वर्गीय प्रेमही असुयेनें काजळतें

कितिदां तूं येतां माझ्या सहज समीप
वाटलें ' वहावें तुज हें जीवित-पुष्प '
बोंचली नको ती एकच हृदया शंका
' सौंदर्य, मनोज्ञा, नसेल मम अनुरूप '

माझिया गृहीं ये अथवा येउं नकोस
तिळही न तयाचा तुझ्यावरी मम रोष
अवशेष स्मृतींचे तरळत जोंवरि हृदयीं
करितील सदा मम काव्याचा परिपोष

लहरीं
९७
ते
९८

तेवविल्या स्मृतिनें तुझ्या स्नेह-ज्योतींत
अंतर्मुख बघतो माझें चित्त व्यथीत
मालवितां परि त्या ज्योती व्यवहारानें
धडपडतो हृदया शोधाया तिमिरांत

जग कधींच निजलें वसुधेच्या पर्यंकीं
चल अखेरचा दे मधुप्याला मज साकी
गुंगींत निशेच्या माझा ' मी ' विसरेन
राहील राहुं दे, शून्यच मागे बाकी

विरहानें उजळी, सान्निध्यानें जाळी
कळणार कुणा ही अपुली प्रीत निराळी ?
जग पाही जाती-धर्मांचे संबंध
अन् सौभाग्याचा लावी तिलक कपाळीं

प्रेयसिची प्रतिभा घेउनि एकांतांत
कुणि प्रियकर रंगे नवतीच्या रंगांत
रसभंग करी रव चुकचुकत्या पालीचा
अपशकून सुचवित, " जळशिल चिर-विरहांत "

वाणीनें त्याच्या झरत्या आपोआप
दूषीत मनांतिल दूरविलें आक्षेप
कुणि दयिता उठली, वदली, " माझें ऐका "
तो मूर्छित झाला, रुतुनि उरीं दृक्क्षेप

घोळवून अधरीं नित थोरांचे बोल
वाढविलें त्यानें रसवंतीचें मोल
अभिरुची वेगळी होति परंतु तयाची
जीमुळें जीवनीं सहजी सुटतो तोल

तूं मिठींत माझ्या जागेपणिं वा स्वप्नीं
ध्यानस्थ तुझें मन ओढितसें मम स्मरणीं
हा ठेवा ज्याचा कुणिहि करावा हेवा
कंचुकीपरी संगोपिन वक्षस्थानीं

मज अजून स्मरती बाल्यांतील उखाणे
जे नेणिवेंतल्या मोहरले शब्दानें
विसरूं कशी तेव्हांचें कल्पित नातें
तें चिरंजीव जाहलें अयाचित दानें

किरणापरि आलिस स्पर्शित भाव मनाचे
झुळुकेपरि आलिस चुंबित श्रम दिवसाचे
भ्रमरीपरि आलिस आलिंगित मधु-स्वप्न
जें माझें, तें तव दानच सर्वस्वाचें

तूं नको अपेक्षूं जें नच माझें आतां
स्पर्शांत तयाच्या मरणाची दाहकता ”
“ जें हवें मला, जें आणि तुझ्यापाशींच
सुख, त्यांत चिरंतन मज, तें अंकित होतां ”

हें जीवन अपुलें तारेवरला खेळ
दिङ्मूढ करिल जग, जो नच सुटला तोल
क्षण उणा-अधिक जरि राहियलों ‘सह’वासीं
कल्लोळें त्याच्या डळमळेल भूगोल

कवळीत कवडसे स्वप्नांच्या किरणांचे
प्रीतिनें भारलें मन हरिणीपरि नाचें
नकळतां रुते पदिं शल्य फुलोऱ्यांतील
उन्मेष जुमानि न त्याचे क्लेश क्षणाचे

लहरीं १९ ते १०४

लहरी
१०५
ते
११०

थयथयून विरतां आषाढाची धार
बाहेर पाहिलें सहज उघडुनी दार
अरुणोदयिं नाहत होतें गगन निरभ्र
परि माझ्या उरिं जागल्या निशेचा भार

ने मृत्यो ! वाहुनि स्कंधिं कधिंहि निर्माल्य
या कुडींत आतां उरलें केवळ शल्य
मजपाशीं होतें अनुपम परि ऐहिक जें
सखि हृदयिं माझिया तें जीवन-कैवल्य

लावून उशागत समई वाचित होतें
किति वेळ न कळलें तुझीच रे स्मृतिगीतें
कारुण्य-सिंचनें हिरवळली होती ती
डोळ्यांचें म्हणुनी क्षणहि न लवलें पातें

स्वस्तिकाकार गुंफून उरोजीं हात
मी नाहत होते चंदेरी स्वप्नांत
मज जाणवली परि वस्त्रांची तटबंदी
अवघडल्या देहीं तशीच सरली रात

बोलूनिहि जें तुज बोलतां न कधिं आलें
तें हितगुज दिसलें लोचनांत हिंदळलें
अतृप्त निशेची गुंगी होति तयांत
कवितेंत उतरतां अमृतमय तें झालें

मी भाव-जलाशयिं करीत होते स्नान
ठेवून तटावरि वस्त्रासह अवधान
तो परिचित मुरलीरव मम कानीं येतां
स्मृति वेलीवरलें गळलें हिरवें पान

लाटा
आणि
लहरी

लहरी
१११
ते
११६

तुजविषयिं चिंतिलें कधीं कधींहि न जें मी
तें अचूक होतें तुझिया अंतर्यामीं
जाणीव जळति डोळयांत तुझ्या बघतां ती
एकांतीं अंतर्दृष्टि खिळे परिणामीं

स्वच्छंदें घालित पिंगा येतां, वर्षे !
हा थरारला गिरि तुझ्या पयोधर-स्पर्शें
मग स्वर्गहि ढळला त्याच्या दृष्टीपुढला
काजळलें जीवन ओहळलें उन्मेषें

" गत्रसतां आज मज तुझ्या मनाचा ठाव
वाटलें लपविला व्यर्थ आजवरि भाव "
" जिवलगा तुझी मी असते जरि यापूर्वीं
क्षितिजांनीं नसतें किनारलें तव नांव "

दल हलतां, होतां शिलेदार मार्गस्थ
जाहली गवाक्षांतिल ललिता अस्वस्थ
जागविल्या रात्रीं किती तिनें विरहीं त्या
रेशमी ऋणांचें दर्शन घेत उरस्थ

नसतीस जरी तूं, नसतो मी हा आज
अन् असतो तरिही, नसतो हा कविराज
पाचूंच्या तेजें हंसे बिंदु पर्णींचा
तव किमया चढवी जीवनास नव साज

चल मदालसे, मज निरोप द्याया ऊठ
घेऊन निघे रवि नक्षत्रांची लूट
नयनांतिल विरला गंध निशास्वप्नांचा
अन् शिथिल जाहली वक्षावरली मूठ

लहरीं ११८ ते १२२

भावार्थ बंधुनि तव कवनीं मानस-स्पर्शी
जवळून पहाया तुज मी नित्य अपेक्षी
पंखांस जगाच्या स्पर्श घनश्यामाचा
तो विहंग यावा निवाऱ्यास मम वक्षीं

तूं हांस, खेळ, मन रंजवि सखि-वलयांत
विरलेल्या जीवा काजळवी एकांत
मज मात्र तडकुं दे, दुभंगु दे तुजसाठीं
आणील दाह तो मधु माझ्या कवनांत

केसाळ श्वान कुरवाळित लाडिकतेनें
ती गुंगत होती नटि कुठलेसें गाणें
वाहना भोंवतीं जमलेल्या मधुपांस (!)
दृक्क्षेप तिचे गमले अनुपम नजराणे

तो आला माझ्या दारीं वेळिंअवेळीं
याचना तयानें परि न कशाची केली
आवडतें होतें एकच त्याचें गीत
मज स्मरतें ज्याचें धृवपद वेळोवेळीं

कधिं म्हणसि, " सन्निधीं सखे तुझ्या मन हर्षे "
बोलसी परि कधीं " मरण तुझ्या ये स्पर्शें "
" चंद्रिके ! दर्शनें तुझिया थयथयतो जो
उदधिचें ऊर त्या भरलें विष-पीयूषें

लाटा आणि लहरी

भस्मभूत होतां प्रीतींतिल आसक्ति
जीवनांत पाहे डोकावून विरक्ति
व्याकुळला आत्मा निमिष-पळाला वांछी
" या देहापासुनि मिळेल कां मज मुक्ति ? "

मी असे अहर्निश आपुल्याच तालांत
हितगूज चाळवित कुठलें तरि गालांत
पापण्यांत नाचे तेव्हां भाव जिवाचा
हर्ष-भृंग रंगे आणिक हृदय-दलांत

लहरी १२३ ते १२८

येणार समीप न कधीं कधींही दोघे
गुंफित तरा मन आपुलकीचे धागे
प्रीतिची शाल ही राहियली जरि अपुरी
तरि तिनेंच भूषव मम आशांचें थडगें

ये कधिंहि, परी ये होउनि श्रावणमेघ
उधळीत उरींच्या ऊर्मींचा आवेग
मन तुझ्या स्मृतीनें व्याकळून कधिं येतां
सुखवील तया ती वक्षावरली रेघ

सूर्याचें वळतां गगनांतुनि पाऊल
तारका निघाल्या शोधित चंद्र-महाल
लज्जान्वित घेती बुरखा त्या ज्योत्स्नेचा
उंबऱ्यांत येतां हंसत सुधाकर लाल

हरपला सुधांशू अवसेच्या तिमिरांत
तारका जाहल्या म्हणुनी ह्या विक्रांत
परि प्रीति तयावरि होति असीम जियेची
ती विरली ढळली, दडली भूगर्भांत

वनमाले ! सागर-गर्भ तुझ्या उदरांत
चालसी म्हणुनि कां अंबरपथिं कैफांत
परि सावध ! चुकुनी शैलेंद्राच्या स्पर्शें
थबकशील, चळशिल, ढळशिल अन् निमिषांत

यज्ञांत होउं दे ह्या मम जीवन दग्ध
तूं रहा हवीतर इथें, परंतू मुग्ध
चाळवूं नको मन समाधिस्त दृक्क्षेपें
रक्षेंत विरूं दे भाव अतां संदिग्ध

लहरीं १२९ ते १३४

मी तुझी न आतां आणिक नच तूं माझा
भंगल्या शिलेची व्यर्थ यापुढें पूजा
वाऱ्यावरि उधळुनि स्वप्नांचें निर्माल्य
मुक्तिचें मनाच्या गाऊं गीत झपूर्झा

ही एकतारिची जुळली माझ्या तार
हा होइल हलका ऐहिकतेचा भार
परमार्थ नित्य नव शोधित छंदोवलयीं
धुंडितां विश्व हें, दिसेल मुक्तिद्वार

स्मृतिशीलेवरली अपुली मीलन रेषा
कधिं फुलवी हृदयीं गत-जीवन-उन्मेषा
प्रकटतां तयांच्या शब्दांतुनि रस-गंध
करि दुःखद आठव निर्माल्यांतिल आशा

हिंदोळ्यावरती वाळवितां कचभार
येशील अनाहुत वाटत होतें फार
सायंतनिं येतां झुळुकी मधु-गंधाच्या
घेतला लपेटुनि पदर, लोटलें दार

नजरेंत भरें जें, येइ न हातिं परंतू
त्याच्यास्तव बांधी मन स्वप्नांचा सेतू
मग मुशाफिराचें होतें जगणें त्याचें
वाटचाल त्याची सांधी जीवन-मृत्यू

माझ्यांतच होतें मुरलें मी त्या काळीं
दर्शनें तुझ्या मी स्फुरलें, झालें मुरली
ती धरितां अधरीं, न्हालें सप्तसुरांत
कुलवंश विसरलें, उरलें मी न निराळी

कशि रमसी माझ्या कविता-स्वर-संवादीं
ती राख जिवाच्या होत्या जळत्या व्याधी
श्रद्धेनें विभुती लाव हवी तर भालीं
दिव्यत्व जाण परि बांधुं नकोस समाधी

मातींतुनि उचलुनि माझें जीवित-पुष्प
क्षाळिलें तूंच त्या सिंचुनि लोचन-बाष्प
परिमळलें मानस घडिभर तरि तुजसंगें
हंसत अतां साहिन निर्माल्याचा शाप

अस्मान आक्रमित ये मम मानस-मेघा
हिरवळुं दे तुझिया दानें परिसर अवघा
मी निळावंति, मग माझें भाग्य असीम
आकंठ भरुनि तव कवळिन कीर्ति-जलौघा

कटिपाशीं तुझिया असतां मम भुजबंध
पुनवेच्या चढत्या घटका झाल्या धुन्द
परततां चंद्रमा मावळतीच्या दारीं
रात्रीसह विरले मखमाली संबंध

कर्तव्य संपतां, नयनिं रंगतां सांज
मन त्रिरसुनि उतरी नवरंगाचा साज
मुक्तीस्तव घडिभर लवला थकला देह
एकांतीं कवळी निर्माल्याची शेज

लहरीं
१३५
ते
१४०

लहरी
१४१
ते
१४६

" विसरून जायला हवे तुम्हीं मज आतां
वदलीस तूं नि मी विलग जरासे होतां
लोचनीं रंगले परि जे मीलन-राग
वेगळेपणा कां येइल कां आचरितां ?

क्षणभरीच चुकवुनि डोळे जनरीतीचे
पाहिलें बेगडी हास्य तुझ्या प्रीतीचें
अन् कळलें भासें अमोल जें बिजलींत
त्या सूर्यप्रकाशीं मिळें मोल मातीचें

लाभेल कधींहि न हृदया तुजसि हवें जें
वाहसी कशा मग विफल जिवाचें ओझें
हा संचय देहीं अस्थि-मांस-रक्ताचा
मृत्तिका, न जेथें, अक्षय प्रीति विराजे

मध्यरात्र सरली प्रतीक्षेंत तुझिया गे
आलोचन तरिही मन हें विरही जागें
कां प्रातःकाळीं तोलुनि प्रीति-तपस्या ?
येशील नाहुनी रवि-किरणांत हिमांगे

आधींच जाहला विलंब घरुनि निघाया
ही मावळतीच्या कुशींत लपली सन्ध्या
काजळली पाउलवाट, त्यांत एकाकी
करि दीप न, मी तुज येउं कसा भेटाया ?

नच पूजितसे मी कोणताहि देव्हारा
मज म्हणतो नास्तिक म्हणुनि सुहृद्गण सारा
परि दैवत माझें तूं, असतां मजपाशीं
भक्तिचा बेगडी मांडुं कशास पसारा ?

घेऊन उराशीं व्यथित मनाचें ओझें
हें थकलें लवलें आजच जीवन माझें
मग सफल व्हावया फुलल्या प्रेरित आशा
उल्लंघूं कैसी दृष्टि-पथांतिल क्षितिजें

लहरीं १४७ ते १५२

अंधारें जेव्हां जग आषाढघनानें
मनिं घुमतीं माझ्या विरहि-प्रीतिचीं कवनें
बैसतो गवाक्षीं मग मी घेउनि वीणा
सौगंधित होई परिसर मधु-लहरीनें

सहजीवन अपुलें वर्षांतुनि घटकेचें
कवितेस माझिया होई चिर-स्फूर्तीचें
षड्ऋतूंत एकच श्रावण-घन-वर्षावें
वर्षभरी भरुनी राहि हृदय सरितेचें

बिलगतां कधीं तव विजनीं स्मृति-काहूर
भिरकावुन देतो जीवन–वसनें दूर
लाभतां मनाला तृप्ती, तनु तेजाळे
बेहोषुनि नाचें नयनीं प्रणय–मयूर

'सोड ! सोड सारे छंद अतांतरि राया'
तळमळून विनवित होत्या गोपि कन्हैय्या
ओंठावर होते नीतीचे निर्बंध
तरि मुक्त पयोधर स्फुरले आलिंगाया

तूं तिथें आणि मी इथें, कितीतरि दूर
दर्शना तुझ्या तरि धांवें मन चौखूर
जागृतींत बघणें मीलन मधु–स्वप्नांचें
ही आशा केवळ कवळी फुटलें ऊर

लहरीं
१५३
ते
१५८

" हृद्‌बंध उकलिले प्रिय मधुपा तुजसाठीं
रस–सेवन करि ये अतां अधिरल्या ओंठीं
देचुंबन निस्संकोचें, " वदलि सरोजा
संकोच पावली स्वयेंच बसतां गाठीं "

जीवनांत तुझिया विरघळलें मी पुरती
नच उरली आतां अन्य–कामना–पूर्ति
राहील चिरंजिव उद्यां जगांत तुझें जें
तें कला शिल्प तव, गाइल माझी कीर्ति

भेटलों हव्या त्या वयांत आपण दोघे
गुंतले नको त्या वयीं मनाचे धागे
त्या आजवरीच्या उकलण्यांत निरगांठी
ह्या वयीं अहर्निश जीवन माझें जागें

खड्‌गांत उतरतां बाहूंतिल पुरुषार्थ
ये चरणीं त्याच्या विश्रांतिल सामर्थ्य
मुद्रिका तयाची होती एकच, जींत
पाहिला तयानें जीवनिंचा ध्वन्यर्थ

कोणत्या जिवाचा लपवित मीलन-हेत
हे करिति प्रतीक्षा उरिं तव यौवन-दूत
सहयोगें त्यांच्या वांछित तुज लाभेल
तूं स्फुरशिल, परि ते जातिल चुरुनि निरर्थ

लाटा
आणि
लहरी

शब्दांत कधींहि न आलें जें बोलाया
कधिंही न कटाक्षें आलें जें कवळाया
दिनरात मनीं ते हिंदळणारे भाव
तूं मोहरतां, अधिरलें तुला फुलवाया

उंबरठ्यापुढली बघुनि तुझी रांगोळी
अन् परिसुनि ओंठांवरल्या मंजुळ ओळी
'सह' भाव हवा तो तुला लाभला, वाटे
दे साक्ष तयाची कुशींत रुतली चोळी

लहरीं
१५९
ते
१६४

असमर्थ शब्द मम भाव तुझा स्पर्शाया
उत्तुंग हवा गिरि घनमाला वर्षाया
जवळीक परंतू तुझी कशी लाभावी ?
जी उत्कटतेनें गावी मन हर्षाया

प्रीतींत आपुल्या अबोध सलतें कांहीं
दाहकता सोसित ती, मन कलतें राही
शब्दांत फुलावे कितीकदां मज वाटे
उरिं दाटे परि तें कधींच झरलें नाहीं

सोसून पदोपदिं शिरीं घाव टाकीचे
मिळविलें आज हें वैभव इहलोकींचें
मी अचल राहिलों तुझ्यामुळेंच परंतू
स्नेहांकित म्हणुनी मिरवितात बाकीचे

कुणि म्हणो, परि न मी म्हणेन 'येसि उगाच'
मजपुढेंच कां तव रसवंतीचा नाच ?
जाणते जरी तव शब्दांची किमया मी
तव भाव-स्पर्शें कांच न होइल पाच

स्त्री-सौंदर्या तव दर्शनही मायावी
दृक्क्षेपें तुझिया ढळले संत-तपस्वी
जाहलें परी तें सुखद कलावंतास
रंजविली ज्यांनीं प्रतिभेनें त्या पृथ्वी

विसराया तुज मी फिरतो रानोमाळ
माध्यान्हि अवेळीं कधिंही सांजसकाळ
फुंकरिति निखारे परी निशेचीं स्वप्नें
जाळितो देह भडकल्या उरींचा जाळ

लहरीं १६५ ते १७०

वनवासी झालों जरी कुणाच्या रागें
रंगेल अधिक मम प्रतिभा विरह-तरंगें
शब्द–रूप देतां चंदेरी स्वप्नांस
राहील तुझें दिनरात प्रेम मनिं जागें

पुशिलेस मला तूं, " प्रीति कशास म्हणाल ? "
" लाभतां तुम्हां ती मोल कशाचें द्याल ? "
" जीवाचें दिधलें दान व्हावया माझी
जी दो हृदयामधिं धरिते एकच ताल "

प्रीतिच्या दरींतुन जीवन पाझरतें जें
त्यावरी मुशाफिर मन हें तरतें माझें
आकंठ जरी जल मिळे न तें प्राशाया
माधुर्य तयांतिल फुलवी क्षण नवतेजें

" लिहितोस कशाला मजवरती हें काव्य
याहुनी वेगळें असो तुजपुढें दिव्य "
" तूं सांगु नको मज आज तरी हे बोल
प्रतिबिंबित होइल यांतच मम भवितव्य "

" जग जिंकुनि ये करपाशीं श्रमपरिहारा
कर्तव्य प्रीतिहुनि अंतीं श्रेष्ठ उदारा "
गूढार्थ वाचुनी हाच तुझ्या नयनीं, मी
घे आलों अच्युत राहुनि तुझिया दारा

लाटा आणि लहरी

बेहोषपणें लोटितां प्रवाहीं नौका
मरणाची हृदया क्षणहि न शिवली शंका
साहसास माझ्या कारण तूं होतीस लहरीं
कवळाया आतां मृत्युच मारी हांका १७१
ते
ह्या कल्प–तरूच्या मुग्धमधुर छायेंत १७६
मत्हृदय–सारिके गा जीवन–संगीत
आतपें उद्यां हा जातां जळुनि फुलोरा
ओतितां न येतिल भाव प्रीतिचे त्यांत

विश्वस्त होउनी, रमतां तव सहवासीं
कुरवाळित मजला घेतलेंस हृदयाशीं
पाहिलें लोचनीं परस्परांचें रूप
यावांचुनि प्रेमा हव्या कुणाच्या साक्षी?

गिरि-शिखरीं करितां तूं वर्षाव पयोदा!
उल्लंघुनि वाहे सरिता तट-मर्यादा
अभिषेक तेंवि तव होतां प्रीति-सुधेचा
क्षणही न जुमानी वाणी अधर-विरोधा

टेकितां तुझ्या मी वक्षावरती मान
प्रतिभेनें माझ्या व्यापियलें अस्मान
रात्रीसह सरलें स्वप्नांचें रंजन तें
अंथरिते आतां आग पदीं माध्यान्ह

मन उदासवाणें असतां एकांतांत
प्रीतिचें आपुल्या विरचित बैसें गीत
उल्हसीत होतां फिरुनि कधीं गातां तें
करि अवगाहन मन क्षणभर स्वर्गंगेंत ८२ : ८३

सखि - स्वप्न आपुलें गुंफित शशि - किरणांत
मम प्रतिभा होती एकांतामधिं गात
अपुरेच राहतां धागे प्रातःकाळीं
उत्स्फूर्त गीत तें अडखळलें अधरांत

लहरीं १७७ ते १८२

रसभरित कथा वाचुनी कल्पनेंतील
जाहला अनावर तिच्या मनाचा तोल
वाटलें तिला, " मज विभव असें लाभावें "
शृंगार भूषवी आज तिचा, घरकूल

रंगला कन्हैय्या कुंजवनीं गोपींत
लुटियलें तयांच्या कुंभांतिल नवनीत
नाचला परंतू तोच कालिया - शीर्षीं
करि प्रीत जगाची पराक्रमा उत्स्फूर्त

अभ्यासुनि तुझिया प्रीतिचेच सिद्धांत
रचियला, ठेविला जगापुढें नव - ग्रंथ
ते वदले, " लिहिलें, लिहिल असें ना कोणीं "
त्या सांगु कसें, " मी तुझ्यामुळें यशवन्त ? "

घेतसे कधीं तव विश्रांतीस्तव अंक
ऐकुनि मजविषयीं होती जन साशंक
न्हाणितो परी जो वसुधा पीयूषानें
कुणि न्याहळी न त्या चंद्रावरिल कलंक

लाटा आणि लहरी

ती पतीस वदली अपुल्या, " हे कविराज,
सांगेन तुम्हांला ज्यांच्याविषयीं रोज "
थबकतां जरा ती, वदला तो उद्वेगें,
" चल पुढें, नको तें गुण-संकीर्तन आज "

परक्यासम वदलों असतां दोघे जवळीं
अन् मजविषयीं तव झाली वृत्ति निराळी
परक्यासह बघतां तुजला आज परंतु लहरी
मन स्त्रवलें आणिक नजर उरोजीं खिळली १८३
ते
उत्कटता नसती जरि अपुल्या प्रीतींत १८८
रंगलें तरी हें नसतें मन छंदांत
मम सत्कवितेचें सारें श्रेय तुलाच
प्रतिभा न तरंगे केवळ आसक्तींत

अंतरीं आजवर होती आशा एक
संकल्प सन्निधीं तुझिया फुलतिल कैक
गंगौघ प्रीतिचा विरतां परि एकाकी
आमरण जीवनीं अतां चैत्र-वैशाख

अवसेच्या रात्रीं न्याहाळितां ग्रहतारा
आठवला तुझिया अंकावरिल निवारा
उत्स्फुरली हृदयांतुनि जरि कविता-गंगा
चंद्रिके न परि मम शिरिं तव अमृतधारा

तेजाळित होती कशीतरी अवकाशा
प्रज्ज्वलीत केलिस तूंच जिवाची आशा
आकंठ स्नेह चल ओत तिच्या हृदयांत
अन् भिडेल जाउनि तेज पहा आकाशा

" तव चरणिं वाहिलें हृदयाचें स्वामित्व
दिल्दारपणें तरि देसि जगा तव सत्त्व "
" प्रज्ज्वलीत करिसी मज तूं तेजोगर्भे
श्रद्धाच तुझी कवळिते विश्वबंधुत्व "

लहरीं
१८९
ते
१९४

अंबरीं एकला जीवन-दायी मेघ
संचरे स्वैर येऊन जगाचा उबग
हृदयांत खेळतां त्याच्या विद्युत्माला
जलनृत्य करित ये भूवरती सावेग

काधिं थकुनी जातां करितां जीवित-कार्य
मन उल्हसीत करि तुझेंच स्मृति-सौंदर्य
कवळाया बघतां मेघा सागर-वीची
दे दीप किनाऱ्यावरला बुडत्या धैर्य

तरळती तुझ्या अधरींची ज्योत्स्ना-गीतें
मन रमण्या संसारांत, कधीं गुणगुणते
भावार्थ उमगतां चरणांतिल एखाद्या
आकळुनी जीवन तव, मन्मन काहुरतें

जाणिलें अचुक मी अंतरिंचें तव गूज
ऋणभारें म्हणुनी अवनत काय उरोज
व्यक्तवी मनोगत ललिता सूचकतेनें
प्रेरणेंतून ज्या अमर शहा-मुमृताज

कामिनी चिंतिली तुझिया पीन उरोजीं
निशिदिनीं तरळतीं हृदयीं स्वप्नें माझीं
गुणगुणतां, कांहीं आली कंठीं ओठीं
रंगली आणखी कांहीं गीत-सरोजीं

एकान्त भोंवतीं अन् असतां तूं जवळी
आपादशीर्ष तुज ललितांगे न्याहाळिली
राहिलों दूर जरि तुजपासुनि सकोचें
अंतरिचें काहुर शब्दांना कवटाळी

लाटा
आणि
लहरी

दिन–मास–वर्ष–तप सरलें विरही दोघे
आगविला अपुला जनसंमर्द विरागें
तेव्हांच गुंतल्या चुकुनी बसल्या गांठी
आमरण शोधणें त्यांतिल लपले धागे

संध्येचा चढतां काजळता एकांत
संगमिंचे तुझिया आणिक भाव मनांत
राहतां पडुनि त्या निशेंत घटका घटका
विरतात उरींचे क्लेश निळया क्षितिजात

वर्षानुवर्ष जो झाला काल–विनाश
त्यामुळें आज मम होई हृदय हताश
कुणितरी गाइ परि अंतरिंच्या एकांतीं
" केव्हांच वाहिलें हृदय तुला, चल हांस ! "

ही प्रीती भक्ती कवचें आसक्तीचीं
हिंदळे भोगलालसा ज्यांत आत्म्याचीं
तळमळति विलासासाठीं सारे जीव
परिणामीं ज्यांतुन उत्पत्ती विश्वाची

येतात अगांतुक आणि अनाहुत सारे
आलास न फिरुनी तूंच तयांत कसा रे ?
सेवेंत तुझ्या मी असेन चुकलें कोठें
विनविते विसर ते, फोड भाव-बंधारे

नीतिपाठ पढलों यौवनांत चढत्या मी
आवरिल्या कढत्या जीवनिंच्या प्रणयोर्मी
तूं सखये, दिसतां फिरुनी आज तपांनीं
वादळे माझिया अनंग अंतर्यामीं

लहरीं
१९५
ते
२००

८६ : ८७

लहरीं
२०१
ते
२०६

बंधमुक्त म्हणती मज, ते सारे अंध
सखि ! तुझे नि माझे जन्माचे संबंध
कमलिनी परी तूं माझ्या हृदय - तडागीं
परिमळे तुझा मम जीवनांत सौगंध

बोलतोस इतुकी लावुनि भावसमाधी
श्रोत्यांच्या घडिभर विरती व्याधि - उपाधी
कधिं कधीं ठसें मनिं सौष्ठव तवभाषेचें
सोडविण्या येति न शब्दांचे स्वर - संधि

लावण्य आपुलें न्याहळीत आदर्शीं
ती रमली होती एकांतीं कामाक्षी
झणिं संकोचे लीं बघुनी कमलें वक्षीं
जी पूर्वरात्रिंच्या फुलली पाणि - स्पर्शीं

नजरेला भिडतां नजर अंकुरे प्रीती
कालांतीं फुटते येउनि ओंठावरती
बहरास तिच्या ये वक्षीं मत्त फुलोरा
स्मृति - रूप अंतरीं राही दरवळ चित्तीं

मी तुझ्या घराहुन निघतो जेव्हां जाया
पुशितेस मला तूं, "कधिं होइल परताया ?"
पद उंबरठ्यांतच आज परी रेंगाळे
डोळ्यांत बघुनि तव आषाढाची छाया

कोणता बघुनि वेगळेपणा माझ्यांत
राहिलास न कळे आजवरी तूं गात
व्यक्तित्व आज तव अष्ट - दिशांच्या ओठीं
समईसम जळते परि मी माजघरांत

लाटा
आणि
लहरी

राईंत पैलथडि घुमूं लागली वेणू
नादमग्न झाले देहांतिल अणुरेणू
ने यमुने, वाहुनि तिथें माझिया देहा
ह्या जातिल गेहा, वाट बघुनि सखि–धेनु

लहरीं
२०७
ते
२१२

" अधारींचा मधुरस एकदांच मजला दे !
ब्रह्मांड नादविन मग मी कीर्ति-निनादें "
विनवून म्हणाली तुज मत्प्रीती धुन्द
पहिलाच स्पर्श बेताल करी मज स्वादें

घेऊन शशांका रविचें उसनें तेज
अंधारीं करिसी तारांशीं हितगूज
तो उमाळ्यावरी येतां सरते क्रीडा
चोरट्या पाउला करि चाहूल सलज्ज

गायिके, आपुली आवर चढती तान
जाहले मनींचे सुप्त भाव उत्तान
शास्त्रोक्त कलेंतिल पुरे तुझें सा–रे–ग
जाणणें मुक्यानें आतां उरलें गान

वदलीस तेधवां " होशिल कां तूं माझा ? "
बोललों " प्रीतिला खुला न हा दरवाजा "
मेनके ! तपस्या तुझ्या दर्शने भंग
मी तुझ्या जिवाचा, नच विश्वाचा, राजा

उधळून तपस्या जन्माची मुनिवर्या
तूं स्वर्गलोकिंच्या स्पर्शिलें सौंदर्या
कां मोहरतां मग तुझ्या तपाचें बीज ?
झांकिलेस डोळे, लपविलीस तव चर्या

लहरी
२१३
ते
२१८

जागवूं कोठवर स्मृती तुझी एकांतीं
प्रीतीस न सहसा सहवासाविण शांती
यौवनीं बद्ध जो ललितेच्या करपाशीं
लोचनीं तयाच्या मुक्त मनांतिल कांति

चढवितां सारखे हिंदोळ्यावरि झोके
दिसलें न आपणां भवितव्यांतिल धोके
निशिनाथ मावळे, तरि उरिं खेळे गंध
आसमन्त भरलें मात्र अतां काळोखे

वय आजवरींचें तव चिंतनिं विरघळलें
म्हणुनीच तयानें जीवन मम परिमळलें
कुणि म्हणो, "असें हें आसव आसक्तीचें"
मन काल-उद्यांचें जग त्यांतच विस्मरलें

रंगवून चित्तीं वलयें आभासाचीं
भूषवितो दुनिया जीवनिंच्या स्वप्नांची
कुंचला जावरी तुझ्या प्रीतिचा हातीं
ही रंग-संगती जुळेल इंद्र-धनूची

कां उत्स्फुरसी मम वेळिअवेळिं उरोजा ?
किति दूर दूर तो अनभिषिक्त तव राजा
गुणगुणें मधुप तो स्मृति-रूपें कां चित्तीं ?
आरक्त करी जो चुंबुनि प्रीति-सरोजा

मंदिरांत तुझिया असें कितींची ये-जा
जग ऐहिक करितें मोक्षास्तव ही पूजा
मी दूरस्था, परि माझा स्नेह निरंत
कामार्थाविण तुज म्हणेल अक्षय माझा

बघ नौके, आलें आवाहन भरतीचें
हो सज्ज अतां, चल तोड बंध धरतीचे
जोडिलेस ज्याशीं जन्माचे संबंध
हेलावुनि चुंबिल तोच भाव नवतीचे

मी केंवि म्हणुं, "अशी प्रीत कुणा न मिळेल?"
मी केंवि म्हणुं, "असा कुठें न भाव जुळेल?"
मी म्हणेन परि, "ताऱ्यापरि प्रीत असावी–
वादळतां जीवन जीवर दृष्टि खिळेल"

आघात प्रत्यही झेलुनि जीवन-कलहीं
जाहली रक्तबंबाळ आज काया ही
कधिं कधीं वेदना असह्य होतां माझ्या
गुंगींत तुझ्या प्रीतिच्या पडुनि मी राही

"दशदिशा धुंडिल्या थकलें घालुनि साद
ये! अतां तरी ये! ऐकुनि आर्त निनाद"
"कां फिरसी वणवण, करुनि तनूची लाही
मी तुझ्याच हृदयीं घेत रमे आस्वाद"

वानिलें तुझें सौंदर्य कितींनीं प्रमदे
वाचिलें आणि तें कितिकांनीं आल्हादें
भ्रूलता जेधवां लवति तुझ्या अश्रूंनीं
त्या करुण-विलासीं शांति मना मम लाधे

तुडवीन कदाचित् मोरपिसें कीर्तीचीं
बुडवीत कदाचित् कविता मत्स्फूर्तीची
बांधिली परी मी एकदांच जी पूजा
उडवीन न शकलें तिच्या भाव-मूर्तीचीं

लहरी २१९ ते २२४

९० : ९१

१४४३ नों: दि: १६-११-५८

लहरीं २२५ ते २३०

मागलेहि गेले पुढती आणिक पुढले
दृष्टिआड झाले आणि इथें मी अडले
मी यात्री, भिनले माझ्या विरल्या गात्रीं
वेणुस्वर सखये, म्हणून पद अडखळले

अंगणिंची तुझिया पाहुनि हीं फुलझाडें
सांगेल कुणिहि " मन हिचें असें फुलवेडें "
परि येतो जेव्हां तुझ्या अनाहुत दारीं
तुज तुळशी जवळी बघुनी, पडतें कोडें

भरतीवर माझें हेलावून उरोज
कथितोस सागरा दिगंतरींचें गूज
मी सिकता, तिळहि न उरें माझ्या ओलावा
तुज व्यर्थ वाटतें फुलेल प्रीति-सरोज

स्मृतिरूप आपुले आज जरी संबंध
दरवळत्या उरिंचा विरेल कां रतिगंध
अंगांगा स्पर्शित येतां लहर उषेची
कळि फूल होउनी कवळी भाव-मिलिंद

पापण्यांत तुझिया गंध रातराणीचा
जागत्या जिवाच्या उत्कट आठवणींचा
पर्यंक-सुख तुझें चंदेरी, सांगें हा
उरिं चुरलेला मणि तुझ्या एकदाणीचा

नभ लंघुनि येतां रवि पश्चिम दिग्भागीं
सिंचिते तयाचा पथ सन्ध्या नवरागीं
अंगणीं निशेच्या आणि फुलें प्राजक्त
सुचवीत, " रंगला आसक्तींत विरागी "

वरुणाचें मिळतां पदरीं जीवन-दान
उत्स्फरली, झाली गंधवती बेभान
पुरुषार्थ गवसतां कटाक्षांत कामिनिच्या
प्रस्फुरतें तिचिया उरिंचें अस्फुट गान

याचिसी न तूं, तुज देउं कसें मी दान ?
तूं निस्पृह, करुं मी कैंवि तुझा सन्मान ?
येतोस तरी, गातोस कशा तें गीत ?
असहाय करी ज्यांतील भाव, हरि भान

संगमीं तुझ्या जे उठले स्वप्न-तरंग
फेसाळत होता त्यांतुनि तव अनुराग
जातांना सोडुनि दूर तुला निशि-कांते !
पाहतो लोचनीं इंद्र-धनूचे राग

कंठिता आपुलें शापित जीवन रुक्ष
तुज बघुनि पयोदा, हर्षित झाला यक्ष
थबथबला जेथें अंतरिंचा ओलावा
कवळाया उभवी बाहू आर्त हताश

आलीस तरी यायचें आणि तासानें
ही घटका रंगत होति तुझ्या ध्यासानें
अस्तित्वें तुझिया विरे शब्द-संयोग
ये कलाहीनता पार्थिव सहवासानें

* * *

लहरीं
२३१
ते
२३५

सागरा
२३६
ते
२३८

सागरा, विरहतां तुझ्या किनाऱ्यावरती
पाहिली कितीदां सुकती आणि भरती
अंतर्मुख होउनि खिळलें मानस माझें
क्षितिजांत, दूरच्या विरत्या नौकेवरती

चिंतनांत सरतां निमिष-पळें घटकांत
कल्पना रंगल्या सहज भाव-कणिकांत
नादांत उरींच्या लाटा अन् लहरींच्या
अस्तित्व विसरलों भंवतालिल तिमिरांत

लाटा
आणि
लहरी

परि पदन्यास मम तुझिया सिकते वरले
आदळल्या लाटा-लहरींतुनि जे उरले
कुणितरी मुशाफिर मजसम संचरतांना
पदचाल पाहुनी जगतिल जीवन असलें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
२७७८० वि: ......

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५१७
शाखा (स्थळ प्रत)

## माझें तपोधन

### आजचें......

* ★ पाळण्याची दोरी ( नाटिका )
* ★ मृणालपत्रें ( पत्ररूप कादंबरी )
* ★ अशोकाचीं फुलें ( गद्य-काव्य )
* ★ गोमंतक ( नाटिका )
* ★ माझा भारत ( नाटिका )
* ★ भावलेणीं ( ललित-निबंध )
* ★ तपोवनांतील दूर्वा ( एका पालकाची दैनंदिनी )
* ★ डोळ्यांचीं निरांजनें ( गुरु-शिष्यांच्या नात्यांतील स्नेहसंबंध दाखविणारीं पत्रें )
* ★ ताज ( दीर्घ कविता )
* ★ लाटा-लहरी ( रुबाया )

### उद्यांचें......

* ★ वेदनेची वेल ( कविता )
* ★ मुक्ता आणि मीना ( दोन पिढ्यांचें मनोगत व्यक्त करणारे संवाद आणि विसंवाद )
* ★ निळावंतीचें नृत्य ( निबंध )
* ★ रेशमी लड्या ( गद्य-काव्य )
* ★ माझे पदन्यास ( संगीतिका )
* ★ कैलास ( खंडकाव्य )
* ★ दुर्गावाडींतील दैवतें ( कादंबरी )

REFBK-0010583
REFBK-0010583